
# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त १९९३-९४

अरे राष्ट्रकी अमर भावना,
सत्य साधना ध्येयकामना,
भरकर जीवनके अणु अणु में,
कणकण का निज होम जलाता,
ज्योति जगाता, हृदय चाहिए
हृदय चाहिए । हृदय चाहिए ।।



# 'स्व'-रूपवर्धिनी . . .

## कार्यवृत्त १९९३ -९४

### अंतरंगात


☞ हृदय चाहिए

☞ प्रार्थना - एक प्रेरणास्रोत ५

☞ मेंदीच्या पानावर. . . मन अजून १२
- सौ. बागेश्री पोंक्षे

☞ अत्त दीपो भव । १५
- श्री. विलास कुलकर्णी

☞ रात्रीच्या गर्भातच उद्याचा असे उष:काल १८
- कॅ. सनत्कुमार भाटे

☞ न रुळलेली वाट २१
- श्री. संजय तांबट

☞ 'त्यांची' कथाच वेगळी २४

☞ शिक्षण प्रवासाचा एक टप्पा २६



संपादक : श्री. शिरीष पटवर्धन

मुद्रण : प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ पुणे - २.
अभय मुद्रणालय, टिळक रोड पुणे - ३०

रेखांकने : श्री. अरुण फडणीस

मुखपृष्ठ : मीना परांजपे ॲन्ड असोसिएटस्




# हृदय चाहिए । हृदय चाहिए ।

**हृदय चाहिए, हृदय चाहिए,**
**हृदय चाहिए ।।धु.।।**

जो बाधाओंसे रुक न सके
जो दमनभारसे झुक न सके
जो स्वयं सुलगकर ज्वाला भरकर
हृदयहृदयमें आग लगाता
मोहनिशाका तिमिर जलाता
अंगारोंसा दहक रहा हो, भड़क रहा हो
रोमरोममें क्रांति मचाता, धड़क रहा हो
वह शौर्य चाहिए, शौर्य चाहिए, हृदय चाहिए ।।१।।

हृदय चाहिए, पर वह हृदय नही
जो मतवाले, मधुभरे नयनोंकी मस्तीमें
पागलसा होकर जुट जाए।
हृदय चाहिए, वह हृदय नही
जो आशाका संसार बना
उन रंगबिरंगे स्वप्नोंको
पूरा करनेमें जुट जाए ।
हृदय चाहिए, वह हृदय नही
जो आँसूके सागरके क्रूर थपेडोंमें
दु:खोंके झंझावातोंसे
उठती फेनिलकी लहरोंमें
डूबे, उतराए, रो जाए।
हृदय चाहिए, वह हृदय नहीं
जो जगतीकी ज्वालामें
अपनी स्वाभाविक शोभाको तज दे
झट रंग बदल जाए ।
लगतेही आँच पिघल जाए ।
जो अग्निपरीक्षा सह न सके
लपटोंमें जीवित रह न सके
जो भयसे कुछभी कर न सके ।
हृदय चाहिए
अरे मृत्युसे खेल खेलता हृदय चाहिए,
चोटोंको सानंद झेलता हृदय चाहिए,
बाधाओंके गिरि ढकेलता हृदय चाहिए
हृदय चाहिए ।।२।।

हृदय चाहिए,
बढ़-बढ़कर कोरी बात नही
निर्वाचनकी वह घात नही
रोटी कपडेका लालच भर
मजदूरोंका नारा लेकर
गर्जन करते, तर्जन करते
कभी उछलते, कभी मछलते
ऐसा नेता नहीं चाहिए
और नही सस्ते नारें ।
अरे राष्ट्र की अमर भावना,
सत्य साधना, ध्येयकामना भरकर जीवनकी
अणुअणुमें कणकणका निज होम जलाता
ज्योति जगाता, हृदय चाहिए ।।३।।

हृदय चाहिए
रोटी कपडे नहीं चाहिए
धनिकोंका धन नहीं चाहिए,
सुखके सपनें नही चाहिए, नहीं चाहिए ।
अरे हाथका मैल सभी है ।
आज राष्ट्र को हाथ चाहिए
और हाथमें शक्ति चाहिए
शक्तिस्रोत वह हृदय चाहिए
हृदय चाहिए, हृदय चाहिए ।।४।।

दीर्घ दास्यके दुष्प्रभावसे
मुक्त रहे जो हृदय चाहिए ।
मानवताकी क्षुधा मिटाता
अमर तत्त्वका हृदय चाहिए ।
दलित जनोंका अभय प्रदाता हृदय चाहिए
आर्त जनोंकी आर्ति मिटाता हृदय चाहिए,
बंधु बंधुको हृदय लगाता हृदय चाहिए
शांत सिंधुमें ज्वार उठाता हृदय चाहिए
हृदय चाहिए ! हृदय चाहिए !
हृदय हृदयको एक करे जो हृदय चाहिए ! ।।५।।

**— पद्मभूषण श्री. अटलबिहारी वाजपेयी**



# हृदय चाहिए । चा मराठी अनुवाद

(अनुवाद)
डॉ. स्वर्णलता भिशिकर

हृदय हवे ते । हृदय हवे ते
हृदय हवे ते । ।।ध्रु.।।

विपदा ज्याते बांधू न शके
अनय अनीती झुकवू न शके
हृदय हृदय जे चेतविते ते, हृदय हवे ।
मोहनिशेला दग्ध करित जे
स्फुल्लिंगापरि तेजाळत जे
कणोकणी वादळे क्रांतिची
उठवित, चेवत, चेतवीत ते
शौर्य पाहिजे, शौर्य पाहिजे — हृदय पाहिजे ।
हृदय नको ते
मृगनयनांच्या मादक नेत्री
विरघळून जे पागल होइल
जे आशेची रंगबावरी स्वप्ने सजविल
त्या स्वप्नांवर पतंगापरी
जीवन जाळिल ।
हृदय नको ते
जे अश्रूंच्या क्षुब्ध सागरी
दु:खाच्या झंझावातांनी
लाटांच्या दुर्दम आघाती
विरून जाइल, वाहून जाइल ।
हृदय नको ते
जे जगताच्या ज्वालांमध्ये
स्वाभाविक लावण्य आपुले
बसेल हरवून
क्षणोक्षणी जे रंग पालटत
आच लागता करपुनि जाइल ।
अग्निपरीक्षा सांगू न शके
ज्वालांमध्ये हासू न शके
भीतीने जे त्राण हरवते
हृदय नको ते ।
मृत्यूसंगे होड धरिल जे
विपदाही सानंद वरिल जे
संकटशैल पदांनी तुडवित
जे जयिष्णु, जे सस्मित ऐसे
हृदय हवे रे ।

नको नको त्या पोकळ गप्पा
निवडणुकीचे सोंग नको ते ।
दलितांचा कैवार घेउनी
अभिलाषा लालूच दाखवुनी
गर्जन आणिक तर्जन करुनी
उथळामध्ये खळखळणारे
नेतृत्वाचे ढोंग नको ते ।
नकोत त्याच्या स्वस्त घोषणा ।
देशभक्तिची अमर भावना
सत्यसाधना ध्येयकामना
अणुअणुतुन स्पंदित करूनी
सर्वस्वाचा होम करित जे
अंतर्ज्योती जागविणारे
हृदय हवे ते । हृदय हवे रे ।
अन्न- वसन ते नकोच आमिष
धनवंतांचे नकोच ते धन
अरे, हातचा तो तर मळ रे ।
या भूमीला कर्मपरायण हात हवे रे
या भूमीला बल देणारे हात हवे रे
हातांमागे शक्तिस्रोतसे हृदय हवे रे ।
परदास्याच्या अंधारातुन
मुक्त असे जे, मुक्त करिल जे
मानवतेची क्षुधा शांतविल
असे प्रचोदक हृदय हवे रे ।
अमर तत्त्व जे शुक्ति होउनी संपुटि राखिल
हृदय हवे ते ।
जे दलितांना देईल सांत्वन
आर्तांना होइल संजीवन
बंधु-बांधवा निकटी घेईल
शांत सागरी जे क्रांतीचे
वादळ उठविल,
हृदय हवे ते । हृदय हवे ते ।
हृदय-हृदय स्नेहाने जोडित
एकहृदय जे करुनी दाविल हृदय हवे ते ।

**'स्व'-रूपवर्धिनी**

म्हणजेच ....

सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था

☆

व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ

☆

आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार.

☆

विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा.

☆

राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प'

☆

परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी आपुलकी निर्माण करणारी संघटना.

☆

अर्थात, ही पूर्ण वेळची शाळा नाही, शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प.

●●●

## हृदयीचे बोल

'रूप पालटू देशाचे' अशी मनातील सुप्त इच्छा प्रत्यक्ष अवतरण्यासाठी कशा प्रकारच्या माणसांची. . . . नव्हे नव्हे हृदयांची देशाला गरज आहे; याचे सार्थ वर्णन ज्यांच्या रोमरोमात जाज्वल्य देशभक्ती भरलेली आहे, त्या खासदार अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या "हृदय चाहिए" या काव्यात अत्यंत समर्पक शब्दात केले आहे. अशी हृदये घडवण्याचा 'स्व'रूपवर्धिनी हा एक नम्र, छोटासा प्रयत्न आहे. छोट्या छोट्या कामातूनच मोठ्या मोठ्या कामाला जन्म देणारे नेतृत्व जन्माला येते, यावर विश्वास असलेल्या कार्यकर्त्यांनी वर्धिनीच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली. गेली १६ वर्षे हा छोटासा प्रयत्न अविरतपणे चालू आहे, विकास पावतो आहे. किमान वर्षातून एकदा तरी ज्या समाजाने हे काम पहिल्या दिवसापासून उचलून धरले आहे; त्यांच्या समोर या कामाचा आढावा गेला पाहिजे, या भावनेने केलेला आहे हा कार्यवृत्त प्रपंच! १९९३/९४ वर्षासाठीचा प्रवास कोठवर झाला आहे आणि पोहोचायचे आहे ते लक्ष्य याचे स्मरण या निमित्ताने होते, जमाखर्चाची बाजू लक्षात येते आणि बळ मिळते पुढील प्रवासाचे !

अर्थात आपल्या साऱ्यांचे आशीर्वाद, शुभेच्छा पाठीशी आहेतच.

# प्रार्थना - एक प्रेरणास्रोत

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा।।




हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी।
स्मरुनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।।१।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।।२।।

स्फुरो कल्पनाशक्ती अभ्यास - यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे
घडावी विवेकी कृती ध्यास हा ।।३।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणू ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।।४।।

---

ही 'स्व'-रूपवर्धिनीची प्रार्थना आहे. येथे येणारे सर्वजण ही प्रार्थना रोज म्हणतात. प्रार्थना रोज म्हणणे हा देखील एक संस्कारच आहे. रोज प्रार्थना म्हणताना न कळत त्याच्या अर्थाकडे लक्ष जाते आणि त्यातून मिळते कामाची प्रेरणा. असं वाटतं की या प्रेरणेचाच परिणाम घडतो आणि काम करताना कळत-नकळत काही प्रसंग, काही कार्यक्रम असे घडून येतात की प्रार्थनेतील दडलेला अर्थ प्रकट होतो. एका अर्थाने प्रार्थना जगण्याचा काही अंशी प्रयत्न केल्याचे समाधान लाभते.

हा आहे प्रार्थना जगण्याच्या दृष्टीने कळत नकळत झालेला गेल्या वर्षभरातील प्रयत्न.

**स्मरुनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही . . .**

आपल्या देशाचे रूप पुन: चैतन्यशाली बनावे, देश सुखी व्हावा; जगाला आपल्या या

*With Best Compliments From :*

**M/S. ELECTROMARK ASSOCIATES**

42, Electronic Estate,
Pune-Satara Road, Pune - 411 009.

देशाची, येथील संस्कृतीची, विचारांची महती पटावी असे प्रत्येक राष्ट्रभक्त नागरिकास मनोमन वाटतच असते. परंतु हे 'वाटणे' प्रत्यक्षात येणे; आज इतके सोपे राहिले नाही. मातृभूमीला बोलता आले असते तर तिने तिच्या व्यथा तिच्या प्रिय पुत्रांपुढे मांडल्या असत्या. जागेपणाने सभोवतालीच्या घटना पाहिल्यानंतर मात्र या व्यथा जाणवतात. साहाजिकच उद्‌भवलेल्या वेगवेगळया समस्या डोळ्यांसमोर उभ्या राहातात.

(१) विवेकानंद शाखेतील युवक दर शनिवारी एकत्र बसून अशा एखाद्या 'व्यथेचा' सामूहिक विचार करतात. पंजाब समस्या, काश्मीर समस्या, नर्मदा प्रकल्प - उलटसुलट बाजू अशा प्रकारच्या विषयांवर पुस्तकवाचन, चर्चा या वर्षामध्ये झाली.

(२) सुजलाम सुफलाम असं वर्णन असलेल्या या देशाच्या दुष्काळी भागातील पाण्याची परिस्थिती कशी आहे, यातून बाहेर येण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाययोजनांची गरज आहे या संदर्भात प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या श्री. संतोष गोंधळेकर यांनी रामकृष्ण शाखेतील वर्धकांपुढे आपले विचार मांडले.


(३) स्वेच्छानिवृत्ती घेऊन "गंगाकावेरी" प्रकल्पाचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या, काका देशपांडे नावाच्या कार्यकर्त्याने वर्धिनीतील युवकांना या अतिप्रचंड, अतिमहत्त्वाकांक्षी प्रकल्पाची माहिती मॉडेलसह समजावून सांगितली. सारा समाज जर या कामासाठी कटीबद्ध झाला तर हीच मातृभूमी पुन: एकदा सुजलाम सुफलाम् अशी होऊ शकते. या बाबत अत्यंत प्रेरणादायी विचार त्यांनी मांडले.

(४) युवकांच्या शिबिरात श्री. श्यामराव आपटे यांनी घुसखोरीमुळे निर्माण झालेली समस्या चित्रफितीद्वारे युवकांसमोर मांडली. देशाच्या सीमाच जर सुरक्षित नसतील तर संपूर्ण देशच कसा संकटात सापडू शकतो याची जाणीव या चित्रफितीमुळे निर्माण झाली.

**तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला**
**तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा . . .**

प्रत्येक शाळेमध्ये रोज एक प्रतिज्ञा म्हटली जाते. 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. . . ' या प्रतिज्ञेतील ही भावना कृतीत आणण्यासाठीचा संस्कार या चरणात आहे. या सर्व बांधवांमध्ये आणि माझ्यात कोणताही भेद नाही. गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, ग्रामवासी-शहरवासी असे सारे नकळत निर्माण होणारे भेद आपल्या कृतीतून पुसून टाकण्यासाठी तसे प्रत्यक्ष कार्यक्रम घेऊन बंधुत्वाची ही भावना जोपासण्याचा हा प्रयत्न आहे. आणि एकदा सारेजण माझे बांधवच आहेत अशी मनोभूमिका तयार झाल्यावर मग त्यांच्या व्यथा, त्यांचे दु:ख, त्यांच्या भावना या मला माझ्या वाटायला लागतात आणि आत्मीयतेने मदतीचा हात पुढे येतो.

(१) डिसेंबर' ९३ मध्ये पुण्यातील नाथ हरी पुरंदरे प्राथमिक शाळेतील एक सहल पुण्याजवळील 'रामदरा' या स्थळाकडे जात होती. परंतु नियतीच्या मनात काय होते कुणास ठाऊक? या सहलीतील एका बसला अपघात झाला. आणि सुमारे ३०-४० बालके या अपघातात ठार झाली, तर बचावलेले अनेकजण गंभीररीत्या जखमी झाले होते. निर्दयी माणसाच्या हृदयालाही पाझर फुटावा



असेच या अपघाताचे दृश्य होते. वर्धिनीच्या शाखांमधील मुलांनी संबंधित मुलांच्या पालकांचे पत्ते मिळवून त्यांना आणि शाळेला सांत्वनपर पत्रे पाठविली. बालशाखेतील चिमुरडी मुलंमुली तर पुष्पाताईंचा हात धरून ससून रुग्णालयात गेली होती. गंभीररीत्या जखमी झालेल्या आपल्याच बांधवांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या हातात ना पुष्पगुच्छ होता ना गोळ्या बिस्किटे! परंतु या बालांनी या जखमी मुलांचे हात हातात घेतले. त्यांना छान छान गोष्टी सांगितल्या, गाणी म्हटली. एका चिमुरड्या मुलीने तर यायला उशीर झाला म्हणून पालकांपाशी हट्ट धरला. आणि त्यांना घेऊन ती तडक ससून रुग्णालयात पोहोचली.

**(२) ॐ सहनाववतु सहनौभुनक्तु :** दिवाळी साजरी करू न शकणाऱ्या समाजबांधवांनाही या आनंदाच्या सणात सहभागी करून घेण्यासाठी दरवर्षी दिवाळीच्या पहिल्या दिवशी अशा बांधवांना दिवाळीचा फराळ देण्यासाठी वर्धक जातात. या वर्षी रेल्वे प्लॅटफॉर्मवर काम करणारे कष्टकरी, हमाल, अशा समाज-बांधवांना वर्धकांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

**(३) रक्तदान . . . दान नव्हे कर्तव्य :** आपल्या कामाच्या माध्यमातून अधिकाधिक रक्तदान व्हावे या हेतूने वर्षातून २-३ रक्तदान शिबिरे घेतली जातात. या वर्षी सुमारे २०० बाटल्या संकलित झाल्या. या व्यतिरिक्त गरजू रुग्णांना रक्त देण्याची आवश्यकता असेल त्या वेळेस युवक जातातच.

**(४) शिकुनिया अक्षर होऊ या साक्षर :** एका पाहणी अहवालानुसार २००० साली जगाच्या तुलनेत आमच्या देशातील अशिक्षित/अडाणी लोकांची संख्या ही सर्वाधिक असणार आहे. हे चित्र नक्कीच अस्वस्थ करून सोडते. ही समस्या दूर करण्यासाठी आपणही आपला खारीचा वाटा उचलला पाहिजे. वर्धिनीच्या शारदामणि महिला विभागातर्फे प्रौढ साक्षर वर्ग सदा आनंदनगर झोपडपट्टीमध्ये चालविले जातात. या वर्गामध्ये मुस्लीम महिला अधिक संख्येने येतात. एकूण ६ ठिकाणी चालणाऱ्या

*With Best Compliments From :*

**M/S. BALDOTA SAMAL AND ASSOCIATES**

'Darshan' 1, B. J. Road,
Pune - 411 001. ☎ 623737/627844

या वर्गामध्ये सुमारे ७० महिला सहभागी होतात. अंक ओळख, अक्षर ओळख, छोटी छोटी पुस्तके वाचणे असे विषय तर होतातच परंतु त्या पलीकडे जाऊन त्यांना अन्य विषयांचे देखील मार्गदर्शन केले जाते. या वर्षी अल्पबचत, सकस आहार, मुलांचे आणि स्त्रियांचे आजार, घड्याळ कसे वाचायचे या विषयांचे त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.




या वर्गामुळे काही महिला आता बसवरील नंबर वाचू लागल्या. दुकानदाराने लिहून दिलेला हिशेब वाचू लागल्या. तर काही महिलांना पुड्याच्या कागदावरील मजकूर वाचायची सवय लागली आहे.

**(५) फिटे अंधाराचे जाळे, वर मोकळे आकाश —**

भुकंपाच्या दुर्दैवी आपत्तीतून वाचलेल्या विद्यार्थी -विद्यार्थिनींच्या मनात पुन: एकदा आत्मविश्वास जागवावा या हेतूने लातूर येथे १५० मुलामुलींचे एक शिबिर वर्धिनीने घेतले. १ ते ८ मे ९४ या कालावधीत झालेल्या या शिबिरात कला, क्रीडा, नाट्य, हस्तकला, शिवचरित्र कथन, ध्वनीचित्रफिती अशा माध्यमातून या विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक बल वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी १६ युवक युवती व १२ वर्धक विद्यार्थी लातूर येथे गेले होते.

**(६) उघड्या बोडक्या माळावर, आभाळाच्या छताखाली :** असं जिणं आजही कित्येक भटक्या जातीजमातींच्या लेखी आहे. काही चूक नसतानासुद्धा निष्पाप मुलांना भटक्यांचे जीवन जगावे लागावे हे किती क्लेशकारक आहे. फासे-पारधी समाजातील अशा २५ मुलामुलींना निवडून त्यांना स्थिर करण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सामाजिक समरसता मंचामार्फत यमगरवाडी (तालुका तुळजापूर) येथे एक वसतिगृह चालविले जाते. वर्धिनीने याही मुलांसाठी एक शिबिर ९ ते १३ मे १९९४ या कालावधीत घेतले. या शिबिराच्या निमित्ताने या मुलांची निरीक्षणशक्ती, शारीरिक चापल्य, त्यांचे विचारविश्व यांचे दर्शन, युवक कार्यकर्त्यांना झाले.

**(७) थंडगार सावलीतले, थंडगार पाणी :** दरवर्षी १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करायला लाखो लोक येतात. एप्रिलच्या रणरणत्या उन्हात अभिवादन करायला येणाऱ्या आबालवृद्धांना तेथे आल्यावर हवी असते थंडगार सावली आणि पाणी. गेल्या दोन वर्षांपासून पाणपोईच्या माध्यमातून अशा हजारो बांधवांना आल्हाददायक वातावरण देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. यावर्षी या पाणपोईचा लाभ सुमारे १२००० बांधवांनी घेतला.

**(१) स्फुरो कल्पनाशक्ती अभ्यास यत्ने :** समाजातील दु:ख-दैन्य, अन्याय-अत्याचार पाहिल्यानंतर संवेदनाशील मन अस्वस्थ होते


आणि इच्छा प्रकट करते या ठिकाणी मी काहीतरी करायला हवंय. समाजाचे भलेच व्हावे असे मनापासून वाटणाऱ्या व्यक्तीला तसे प्रत्यक्ष प्रयत्न करण्यासाठी स्वत:जवळ काही तरी बळ हवेच. बुद्धी, शक्ती, आरोग्य, धैर्य, शौर्य, दृढसंकल्प आणि त्याहीपेक्षा सर्वात महत्त्वाचे 'विवेक'. हे सारे बळ जगत नियंत्याने द्यावे अशी त्याला केलेली ही प्रार्थना आहे. अर्थात् जो स्वत:हून काही प्रयत्न करतो, परमेश्वर त्यालाच सहाय्य करतो हेही खरे आणि म्हणूनच त्या दृष्टीने केलेले हे प्रयत्न या वर्षातले.

कमी जास्त प्रमाणात सर्वच मुले ही अभ्यास करीत असतातच. परंतु काहींना जास्त यश मिळते, काही पूर्ण अपयशी होतात तर काहींना अपेक्षित यश मिळत नाही. अभ्यासाच्या विविध पद्धती मुलांनी समजावून घेतल्या, बुद्धीला चालना देण्याचे तंत्र शिकून घेतले तर यश मिळविण्यासाठी त्याचा निश्चितच उपयोग होतो. वाचन कौशल्य, स्मरण कौशल्य, निरीक्षण कौशल्य, प्रयत्न कौशल्य अशा विविध अभ्यासपूरक कौशल्यांचे शिक्षण वर्धक विद्यार्थ्यांना मिळण्याचे दृष्टीने या वर्षात दोन अभ्यास कौशल्य शिबिरे संपन्न झाली. प्राचार्य श्री. विवेक पोंक्षे, सौ. नलूताई गुजराथी, सौ. अनघा लवळेकर इत्यादी ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी ही शिबिरे यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहाय्य केले.

**(२) सामुहिक विचार विनिमयाची शक्ती :** एखाद्या विषयाचा विविध अंगांनी विचार करता येण्याची सवय वाढावी आणि सगळ्यांनी मिळून एखाद्या विषयाचा अभ्यास करून कृती करावी या दृष्टीने वर्धिनीच्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांना गटकार्ये दिली जातात. गटकार्यासाठी दिलेल्या विषयाच्या संदर्भात त्या त्या गटातील विद्यार्थी सामुहिक चिंतन करतात, हिंडतात, बोलके होतात आणि या साऱ्यातून नकळत "संघभावना" सुद्धा वाढायला लागते. या वर्षभरात गटकार्यासाठी दिलेल्या विषयांपैकी काही विषय खालील प्रमाणे होते.

(१) डॉक्टर व इंजिनिअर यांच्या इतकेच पैसे व प्रतिष्ठा मिळवू शकतील अशा ५० व्यवसाय क्षेत्रांची माहिती मिळविणे.
(२) शीतकरण पेटी बनविणे.
(३) पुण्यातील विविध ग्रंथालयांना भेटी देऊन त्यांची माहिती गोळा करणे.
(४) खगोलशास्त्र
(५) पावसाळी कवितांचा संग्रह
(६) किल्ल्यांची मॉडेल्स बनवणे
(७) पाच राज्यांची माहिती गोळा करणे
(८) प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती घेणे
(९) पुण्यातील प्राचीन देवळांचा इतिहास
(१०) पुण्यातील एखाद्या परिसराचा नकाशा तयार करणे.

**(३) मानसिक विकास बैठक :** सर्व शाखा आणि प्रकल्पांवर आठवड्यातून एकदा म्हणजेच दर रविवारी सकाळी ६.१५ वाजता मानसिक विकास बैठक घेतली जाते. सकाळच्या प्रसन्न वातावरणात मनाची प्रसन्नता ज्याद्वारे वाढेल, सामाजिक संवेदना ज्यामधून जाग्या होतील अशा विषयांवर आधारित पुस्तकांचे-लेखांचे वाचन, त्यावर चर्चा या बैठकीत होते. सामाजिक क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसमवेत गप्पागोष्टीही या बैठकांमध्ये होतात या बैठकीत या वर्षात खालील विषय घेण्यात आले.



(१) क्रांतिकारकांच्या कथा
(२) पारंब्या या पुस्तकाचे वाचन/चर्चा
(३) अनंत कान्हेरे, झाशीची राणी - पुस्तक वाचन व चर्चा.
(४) धन आणि मन (कथा) — वाचन व चर्चा
(५) दारुबंदी चळवळीमधील अनुभव
(६) संत गाडगे महाराज चरित्र
(७) महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती

**(४) अमृतवाणी संस्कृत भाषा, नैव क्लिष्टा, नच कठिना ।**

(१) सुबोधानंद शाखेतील मुलांची संस्कृत सुभाषिते पाठांतर स्पर्धा या वर्षी झाली. स्पर्धेच्या निमित्ताने मुलांनी अनेक अर्थपूर्ण सुभाषिते पाठ केली.

(२) २७ नोव्हेंबर १९९३ रोजी कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य प. पू. जयेंद्र सरस्वती यांनी संस्थेला भेट दिली. संस्थेचे कार्य समजावून घेतले आणि आशीर्वाद दिले. या निमित्ताने झालेल्या स्वागत कार्यक्रमात रामकृष्ण शाखेतील वर्धकांनी शिवतांडव स्तोत्र सादर केले.

**(५) ॐ सूर्याय नमः** — शरीर काटक आणि सतेज बनावे यासाठी वर्धिनीच्या शाखांमध्ये दररोज सूर्यनमस्कार घातले जातातच. रथसप्तमीच्या निमित्ताने शाखांवर अधिकाधिक संख्येने सामुदायिक सूर्यनमस्कार घातले गेले. त्यातील उत्साहवर्धक संख्या खालील शाखांची होती.

विवेकानंद शाखा — ४५०; क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद शाखा — ४३११

**(६) जीवो जीवस्य जीवनम् ।**


विजय परदेशी या ९वी तील वर्धकाने मराठी विज्ञान परिषद आयोजित विज्ञान प्रकल्प स्पर्धेत भाग घेतला होता त्याने मांडलेल्या "जैविक पद्धतीने कीड नियंत्रण" या प्रकल्पाला जिल्हा व राज्य पातळीवर प्रथम क्रमांक मिळाला.

**(७) पळा पळा पुढे कोण पळे तो** : १९ डिसेंबर १९९३ रोजी पुण्यात आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत प्रथमच वर्धिनीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्यांच्या वयोगटात भाग घेतला. स्पर्धेत आपण मागे पडू नये यासाठी या स्पर्धक वर्धकांनी सरावही मनापासून केला. प्रत्यक्ष स्पर्धेत मात्र स्पर्धेच्या संयोजनातील गलथानपणाचा फटका या स्पर्धकांना बसला. आणि अपेक्षित क्रमांकाची धाव घेऊनही प्रत्यक्ष क्रमांक मिळाला नाही. एक स्पर्धक तर जवळपास सीमारेषेपर्यंत प्रथम क्रमांकाने धावला परंतु तेथे चक्कर येऊन पडला आणि क्रमांक गेला. एका अर्थाने अपयश पदरी पडले तरीही स्पर्धक परतले ते आशावादाने की पुढील खेपेस यशस्वी होऊच.

आणि. . .

जुलै ९४ मध्ये सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाने आयोजित केलेल्या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत वर्धिनीचे विद्यार्थी चमकले. खालील वर्धक या स्पर्धेत खालील क्रमांकाने चमकले.

१) राम जगताप — गटात दुसरा



२) चेतन खानोलकर — गटात सातवा
३) प्रियांका चव्हाण — गटात तिसरी
४) विराज गुंजाळ — गटात दुसरा

राम जगताप हा मैदानी स्पर्धेबरोबरच बॉक्सिंग स्पर्धेतही प्रगती करीत आहे. या वर्षी एका स्पर्धेत त्याने कांस्यपदक मिळविले.

**(८) बेहोष धुंदी ते ध्येयधुंदी :** ३१ डिसेंबरच्या रात्री अलिकडे तरुण-तरुणी वेगळ्याच धुंदीत, बेहोषीत नववर्षाचे स्वागत करतात. दूरदर्शन व नवेनवे चॅनल्स यावरून सादर होणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा दर्जाही घसरत चालला आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर आझाद शाखेने या दिवशी संध्याकाळी दोन तास "वंदेमातरम्" ही समरगीतांची ध्वनिमुद्रिका ऐकवण्याचा स्तुत्य उपक्रम केला.

**(९) घडावी विवेकी कृती ध्यास हा :** एका वर्धक विद्यार्थ्याचे दुसऱ्या वर्धक विद्यार्थ्याशी काही कारणाने भांडण झाले. त्यांच्यातील एकाने दुसऱ्याला या प्रसंगी मारले सुद्धा. ज्याने मारले त्या वर्धकाला घरी गेल्या नंतर मात्र स्वस्थ वाटेना म्हणून त्याने आईला घडलेला प्रसंग सांगितला, आपण केलेली चूक सांगितली आणि मित्राला रागाच्या भरात मारले या कारणासाठी शिक्षा द्यायला सांगितले. ही घटना सदर वर्धकाच्या आईने सांगितल्यामुळे कार्यकर्त्यांना समजली. "घडावी विवेकी कृती ध्यास हा" ही प्रार्थनेतील ओळ केवळ शब्दरूप न राहाता कृतीच्या दिशेने गेली.

**पुन: जन्म घेऊ स्वराष्ट्रास ध्याऊ :** हे परमेश्वरा! आम्ही तुझेच अंश आहोत आणि आम्ही तुझ्याच पूजनाचे हे दिव्य ध्येय स्वीकारले आहे. हे ध्येय सिद्ध करायला हा जन्म अपूरा पडला तर त्यासाठी आम्ही पुन: जन्म घेऊ. हा अर्थ कळायला सोपा परंतु अनुकरण करायला कठीण आहे. परंतु हा अर्थ आपल्या जीवनात प्रगट करून समाजाला चैतन्य देणारे आदर्श सतत डोळ्यांसमोर असतील तर प्रसंगी अशी कृती करणारे वीर आजही निर्माण होऊ शकतात. आदर्श व्यक्तीमत्त्वाचे स्मरण करून अशी प्रेरणा जागवण्याचा हा या वर्षातला छोटासा प्रयत्न!

**(१) कि घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने :** २६ फेब्रुवारी १९९४ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने विवेकानंद शाखेने "बलिदान प्रेरणा दिन" साजरा केला. स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद यांची चरित्रे या दिनाच्या निमित्ताने "त्यांचे मातृभूमीसाठी बलिदान" या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली.

**(२) तुजसाठी मरण ते जनन :** काश्मिरात देशद्रोही अतिरेक्यांशी सामना करता करता वीरगती प्राप्त झालेल्या कॅप्टन ऋषी मल्होत्रा यांच्या वडिलांनी १९ जून १९९४ रोजी वर्धिनीला भेट दिली. युवक शाखेतील युवकां-समोर त्यांनी आपल्या पुत्राचा पराक्रम कथन केला. पराक्रम करीत करीत मातृभूमीसाठी बलिदान केलेल्या आपल्या तेजस्वी पुत्राचा पराकम सांगताना, त्याच्या हृद्य आठवणींनी त्यांच्या डोळ्यात तरळलेले अश्रू पुरेसे बोलके आणि त्यागाची प्रेरणा चेतविणारे होते.

# मेंदीच्या पानावर . . . मन अजून

– सौ. बागेश्री पोंक्षे



शाळेतून वर्धिनीकडे मी आपली चाललेली. सहजच शिकवलेली कविता गुणगुणत पुटपुटत चाललेली. तर मागून माझ्या डोक्यावर टप्पू देऊनच नेहमीसारखी ताईची गाडी वर्धिनीकडे वळलेली. माझी पावलं झपझप पडायला लागली. घरातून जेंव्हा मी निघाले तेव्हा 'उषे, मधल्या वेळात घरी येऊन तुझ्या वाटणीचे पापड लाटून ठेव." आईची नेहमीचीच हाक माझ्या कानावर आलेली. खरं तर खूप सवयच झालेली, मला सगळं करण्याची. पण तरी कधी-कधी डोळयांच्या कडांवरून ओघळणारं पाणी पुसायचीच मी विसरलेली. कोपऱ्यातून वर पाहिलं तर बाबू, दिनू, सुमी, बिल्लू कोणी-कोणीच नाही दिसलं. आज आमचं ताईच्या घरी पद्मावतीला जायचं ठरलेलं आणि तरीसुद्धा कुणीच नाही दिसलं. पायातला दगड चवड्यानं उडवत-उडवत केव्हा वर्धिनी आली ते मला नव्हतंच कळलेलं. दप्तरं कट्ट्यावर टाकून दंगा-मस्तीत प्रार्थनेची वेळ झालेली. तर आम्ही रांगा करून स्टेशनकडे चालत निघालेलो. म्हणजे बसस्टँडपर्यंत चालत जायचं? डोळ्यासमोर निळं काळं काहीबाही व्हायला लागलेलं. तसंच ओळीत उभं राहून ढकलगाडीसारखं चालणारं पाय एकदम थांबूनच गेलेलं. बाबानं चार दिवस पैसे नाही आणलेले म्हणून काही-बाही खाऊन चुलीवर काहीच नाही चढवलेलं. चार दिवस! म्हणून मला चक्कर आलेली. "अगं! अगं! असं काय करतेस उषा!" म्हणत ताईंनी माझं डोकं त्यांच्या अंगावर ओढून घेतलेलं. बसमध्ये मला काही बोलायलाच नाही सुचलेलं. नुसतं खूप काय-काय बोलावंसं वाटून घशात आवंढा आलेला, मी कसाबसा गिळलेला. तर सुमीटली फमीटलीनं घरातलं सगळं सगळं ताईंना सांगितलेलं. अस्सा राग आलेला मला पण ताईंचा हात पाठीवरून फिरलेला आणि मला गाढ झोप लागलेली आणि ताईंच्या मुलीसारखं गोरं-गोरं आणि मऊ मऊ माझं अंग आहे असं वाटून मला मस्तच झोपच लागलेली.

ताईंच्या घरातून निघताना ताईंनी

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parge Chowk,
Barne Road, Pune - 411 011. Phone - 627260

• **All types of Transport Service** • **All over Maharashtra**

पिशवीभर वानवळा दिलेला. गहू, पीठ, डाळीचं पीठ, मीठ, आणि मिरची. हां म्हणजे नक्कीच सुमीनं ताईंना . . . . असू दे! पण मला घरी येताना इतकं हलकं हलकं वाटलेलं की बस्स्! पिशवी दारात ठेवून मी बोळातल्या देवळात अंजीला ताईंचं घर कसं आहे ते सांगायला लागलेली तर मनूताई दळण आणायला जाताना दिसलेली.

त्या दिवशी आमच्या घरात तर खूपच कामं चाललेली. खाट बाहेर काढून खोली लिंपून घेतलेली आणि दिवसभर खपून रंग लावलेला. रंगाची बोटं नाकावर आणि गालावर लागल्यावर मनूताई अश्शी मॅडसारखी दिसलेली की बस्स! तर माझ्या सगळ्या अंगावर रंगांची टिंब आणि रेषा उठलेल्या. गणपती येणार म्हणून मी हट्ट करून रंग लावायला लावलेला. सक्काळी सक्काळी गणपती बसवलेला तर प्रसाद वाटताना दारात वर्धिनीचे सर आणि ताई आलेल्या. ताईबरोबर सय्यद आणि आयासही आलेला. त्यांच्याकडे गणपती नाही ना बसत म्हणून तो खूप खट्टू झालेला आणि आरास करायला मिळालेली नाही म्हणून आरास बघायला आलेला. सरांना आणि ताईंना बघून मला इतका आनंद झालेला की मग मी मनातल्या मनात एक गिरकी मारलेली तर ती गिरकी माझ्या ओठांतून सांडलेलीच नको, नको, म्हणताना! आणि ताईंनी विचारलंच, "काय ग उषे ? हसतीयस कशाला ? मी जेव्हा आमच्या शाळेत अंजीला आणि लल्लीला सांगितलेलं की आमचे वर्धिनीचे सर आणि ताई आमच्या घरीदेखील येतात भेटायला. तर तिनं तिच्या नकट्या नाकाला छानसं उडवून गाल फुगवलेला! आता अंजी असती तर? असा विचार माझ्या मनात येऊन मी खुदकन् हसलेली पण ताईंना कोण सांगणार ही जम्माडी जम्मत. नेहमी प्रमाणे मग ताईंनी माझ्या आईला सांगितलं की मी सातवी पास झाल्यानंतरही कशी 'आजोळ' मधून 'निवेदिता' शाखेत जाऊ शकते. मला कशी शिष्यवृत्ती/मदत मिळू शकते तर एरवी कातावलेली, कंटाळलेली आईसुद्धा मला अगदी आतून ज्योत लावलेल्या स्वच्छ काचेसारखी लख्ख हसताना दिसलेली आणि मी मॅडसारखी आईच्या तोंडाकडे बघतच राहिलेली.

आणि एके दिवशी तर बिल्लूची आई आमच्याकडे आलेली नाऽऽ तर तेंव्हा "आमची उषी वर्धिनीत जाते आणि काय तर न कळणारं बोलत असते" असं कौतूकानं आमची आई म्हटलेली. मी चोरून ऐकलेलं आणि खूप खूष झालेली.

पण आईला जसं वाटलेलं ना ते खरंच खरं असलेलं बरं का! वर्धिनीत आमची ताईदेखील असंच काहीबाही न कळणारं बोलत बसलेली. तर आम्हाला ते सगळंच्या सगळं नाही कळलेलं तरी पण बरचसं कळलेलं. पण कधी कधी कुणाच्या वाढदिवसाला एखादं भेटकार्ड देऊन आमची ताई म्हणालेली, 'या डायन फॉसी का कुणासारखं तरी तुम्ही बनायला पाहिजे. घर सोडून चिपांझीच्या अभ्यासासाठी डायन घनदाट अरण्यात गेली आणि तिने चिपांझीची भाषा अवगत केली. आपण निदान आपल्या बांधवांची भाषा तरी समजावून घेवली पाहिजे. त्यांचे प्रश्न नीट आपुलकीने जाणू घेतले पाहिजेत, किंवा कधी कधी मानसिक-विकास बैठकीत आम्ही पुस्तक वाचायचे तेव्हा ताई कुणाला तरी म्हणलेली, 'इतक्या म्हाताऱ्या

वयात आदिवासी आपल्या शाळेत येऊ शकत नाहीत तर आपली शाळा त्यांच्या पाड्या-पाड्यात पोहोचली पाहिजे असं म्हणणाऱ्या अनुताई वाघांसारखे धाडस आपल्यातल्या कोणाला बरं करता येईल?, किंवा कधी कधी असे धाडसी काका- मामा किंवा मोठ्ठी माणसं ज्यांना कार्यकर्ते किंवा काय ते म्हणतात त्यांना वर्धिनीत सुद्धा ताई घेऊन आलेली, त्यांच्या तोंडून त्यांचं काय-काय काम चालतं हे ऐकताना ताईसुद्धा आमच्या सारखी जीभेचं टोक ओठावर घेऊन विस्फारलेल्या डोळ्यानं ऐकत असलेली किंवा खूप खूप प्रयत्न करून डोळ्यातलं पाणी माघारी सारून अशा लोकांचे आभार मानत असलेली मी बघितलेली. ताई म्हणालेली की 'मला खूप काय करायचंय. निदान हे असे धाडसी लोक आणि तुम्ही मुलं यांच्या मधला दुवा व्हायचंय.' हे असलं काय काय तेव्हा काहीच नाही कळलेलं पण हळूहळू 'आजोळ' मधून "निवेदिता शाखा" आणि शाखेतून "युवती विभाग" अशी आमची गाडी जेंव्हा हळूहळू पुढे जायला लागलेली तेव्हा थोडं-थोडं काय तरी आम्हाला सगळ्यांना कळायला लागलेलं. तेंव्हा कळायला लागलेलं की सगळे ताई आणि दादा काय करत असतील इतकी वर्षे आणि ताईंनी सांगितलेलं की ७५ वर्षांच्या किशाभाऊंचे केस कसे पांढरे झालेले? तर त्यावेळी ताईंच्या अशा बोलण्याचं आम्हाला हसूच कसं आलेलं, असं आता वाटायला लागलेलं. आणि डोक्यात थोडा- थोडा प्रकाश पडायला लागलेला.



आता परवा मी ताईंनी मला सांगितलेली कार्व्हरची गोष्ट जेव्हा आजोळच्या मुलांना सांगितलेली तेव्हा मला कळलेलं की ताईंच्या सुद्धा अगदी आमच्या डेअरींगबाज बेधडक स्वभावाच्या ताईंच्या सुद्धा डोळ्यात का पाणी आलेलं ते. तर असा हा आमचा प्रवास चाललेला. ताईंच्या आणि सरांच्या मदतीने रुकुठुकु चाललेला. तर या कार्व्हरच्या गोष्टीत यांची हडकुळी, अशक्त, काळी, बेंदरी काटकुळी मूर्ती मला माझ्या मूर्तीसारखीच मला वाटलेली. पण कार्व्हरसारखे खूप मोठ्ठे होता नाही आले तरी आपण कुणीतरी व्हायचेच असेच मला आता वाटायला लागलेले आणि मज्जा म्हणजे आमची आईसुद्धा हे ऐकून त्या दिवशी सारखीच आतून ज्योत लावलेल्या स्वच्छ काचेच्या दिव्यासारखी लखख हसलेली.

*With Best Compliments From :*

***ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,***

*Plot No. 4, S. No. 17/ 1 – B, Kothrud Industrial Estate,*

*Kothrud, Pune - 411 029. ☎ 331474, 341124, 340480*

# अत्त दीपो भव !

— विलास कुलकर्णी

***विलास आणि विश्वास कुलकर्णी, वर्धिनीचे युवक कार्यकर्ते नोकरीनिमित्त दोघेही संभाजीनगर (औरंगाबाद) येथे गेले. वर्धिनीचे संस्कार त्यांना स्वस्थ बसू देईनात. या दोघांनी तेथील एका दुर्लक्षित बौद्ध वस्तीमध्ये 'स्व'-रूपवर्धिनीच्याच धर्तीवर एक संस्कार वर्ग १९९० मध्ये सुरू केला. ह्या वर्गातील अनुभवही कार्यकर्त्यांस उत्साह देणारे आहेत. तेथील कामाचा, कार्यक्रमांचा, अनुभवांचा हा त्रोटक वृत्तांत —***

१९९० साली सुरुवातीला पुण्याच्या 'स्व' -रूपवर्धिनीच्या धर्तीवर येथील वीर लहुजी वस्ताद साळवे आरोग्य केंद्रावर एक शिकवणी वर्ग सुरू झाला. सकाळच्या आरोग्य केंद्राबरोबरच शिक्षण देण्यास सुरुवात झाली. प्रतिष्ठानचे काम ज्या त्रिसुत्रीने सुरू आहे. "सेवा-संस्कार-संघटन" त्या दृष्टीने हे पाऊल टाकले गेले. आरोग्य केंद्रावर येणाऱ्या रुग्णांच्या संबंधातील शालेय मुलांना एकत्र करून त्यांना शालेय शिक्षणाबरोबरच खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम सामान्य ज्ञान व आरोग्य शिक्षण देऊन एक सुजाण व देशभक्त नागरिक बनविणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्य सुरू आहे. एकंदरितच वस्ती म्हणजे गरीबी, व्यसनाधीनता, अस्वच्छता, रोगराई, गुंडगिरी ह्या गोष्टी आल्याच. त्यातच राजकीय लोकांचे वर्चस्व, मग अशा ठिकाणी मुले उद्याचे चांगले नागरिक होण्याऐवजी गुंड होतात. परंतु जर आपण त्यांच्याकडे थोडे लक्ष दिले तरीही त्यांच्यातला आत्मविश्वास जागृत होऊन ते प्रगती करू शकतात.

'सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार' ह्या सूत्रानेच येथे काम सुरू झाले. म. न. पा. व जिल्हापरिषदेच्या शाळेत व्यवस्थित लक्ष न दिल्याने ही मुले चित्रपट पाहाणे, जुगार खेळणे



याकडे आकर्षिली जातात. त्यामुळे शिक्षण कमी व त्यामुळे मजुरी करून पोट भरत असतात. ही उद्याची पिढी नीट घडविण्यासाठी आपण शिकवणी वर्ग सुरू केला.

**दैनंदिन काम :** सुरुवातीला अकरा मुलांनी सुरू केलेल्या ह्या वर्गात एक तास खेळ, बुद्ध वंदना व दीड तास अभ्यास होतो. खेळात मुख्यत्वे भारतीय खेळ, व्यायाम, समता, फुटबॉल, बेसबॉल होतो. अभ्यासाचे वेळी मुख्यत्वे इंग्रजी व गणित या विषयातील अवघड प्रकरणे घेतली जातात. तसेच विद्यार्थ्यांच्या इतर विषयातील अडचणी सुद्धा सोडवल्या जातात. जेणे करून सशक्त, बुद्धिमान व तळमळीचे कार्यकर्ते तयार होतील. अशासाठी दर शनिवारी व रविवारी वेगवेगळी चरित्रे, गोष्टी, कथा,

गाणी घेतली जातात. यासाठी बाहेरचे वक्ते बोलावतो.

वर्धिनीच्या युवक गटाच्या राळेगण सिद्धी येथे झालेल्या वार्षिक नियोजनाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे दर महिन्याला पुण्याहून एक कार्यकर्ता दोन दिवसांसाठी एक विषय मांडायला आला.

| | |
|---|---|
| ज्ञानेश पुरंदरे | — शिवाजी महाराज |
| मिलिंद पुरोहित | — आकाशदर्शन |
| पराग जगताप | — भारतीय संरक्षण व्यवस्था |
| शिरिष पटवर्धन | — स्वामी विवेकानंद |
| सुनिल कुलकर्णी | — विज्ञानातील प्रयोग |
| मनिषा बाईन | — सैनिकांच्या कथा |
| पुष्पाताई नडे | — बालग्राममधील आठवणी |

पुण्याव्यतिरिक्त इतर गावचे वक्तेही येथे आले होते.

| | |
|---|---|
| डॉ. श्रीरंग देशपांडे | — विवेकानंद |
| होळीकर सर | — वैयक्तिक उन्नती |
| डॉ. उपेंद्र अष्टपुत्रे | — धम्म चक्र परिवर्तन दिन |
| विनायक कुलकर्णी | — दसरा |
| रामभाऊ बागडे | — विद्यार्थ्यांशी गप्पा |
| रामदास ठोंबरे | — महानिर्वाण दिन |
| एस. एस. भोसले | — शिवाजी महाराज |

### मान्यवरांच्या भेटी

| | |
|---|---|
| श्री. उदय किर्पेकर | — डो.जी.एम्. गरवारे |
| श्री. द्वा. र. जरीवाला | — मुख्याध्यापक गुजराथी विद्यामंदीर |
| श्री. जवळकर सर | — मुख्याध्यापक, ज्ञानप्रकाश विद्यालय |
| श्री. निकम गुरुजी व बढे सर | — साक्षरता अभियान |
| जनता बँकेचे संचालक मंडळ | |
| आयु. काशिनाथ सुर्यवंशी | — मिलिंद कॉलेज |
| कल्याण माद्रा | — सिख संगत |
| गिरिशजी कुबेर | — विभाग प्रचारक, रा. स्व. संघ |
| शंभुजी पुराणिक | — सिख संगत |
| भय्याजी जोशी | — सेवा विभाग, रा. स्व. संघ |
| महादेवराव गायकवाड | — भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान |
| रामभाऊ कुलकर्णी | — रा. स्व. संघ |
| मा. मा. क्षिरसागर | — लातूर विभाग संघ चालक |

**विज्ञान शिबिर** (१९ ते २१ नोव्हेंबर ९३)

केंद्रावरच्या अनेक मुलांच्या शाळेत प्रयोगशाळाच नाही. त्यामुळे दहावीच्या शास्त्राच्या प्रॅक्टीकलच्या पेपरला अनेक विद्यार्थी बसतच नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन या मुलांचे विज्ञान विषयातील प्रयोग प्रत्यक्ष त्यांना करायला द्यावेत. प्रयोगाचे साहित्य त्यांना हाताळायला मिळावे या दृष्टीने विज्ञान शिबिराचे आयोजन केले होते.

**उपस्थिती** — लहुजी केंद्र ३८ व एकूण ६०

या शिबिरात वक्ते म्हणून सर्वश्री मा. मा. क्षिरसागर, दि. दा. जोशी, सुनील कुलकर्णी, डॉ. रंजन गर्गे, प्रा. कांचन देशमुख, नाना नवले, निर्मल दादा नरहरी कांबळे, मधुकर श्रीरंग जाधव, रमेशभाई खंडागळे यांचा सहभाग होता.

### काही निवडक अनुभव

१) दहावीतील मुलांचा मे महिन्याच्या सुट्टीत घेतलेला अभ्यास एवढा उपयोगी पडला की




सहामाही परीक्षेत एम. आय. टी. शाळेत निलेश तुपे पहिला आला. त्याला ७९% मार्क पडले व जेव्हा त्यांचे मुख्याध्यापक त्याचे घर पाहायला घरी गेले तेव्हा ते थक्क झाले. त्यामुळे मी एम. आय. टी. ला गेल्यावर त्यांनी माझ्यासमोर निलेशला शाबासकी दिली.

२) अण्णा सरोदे हे मिलिंद नगर मध्ये राहणारे. त्यांचा मुलगा आपल्या वर्गात आला व त्यानंतर ते संपर्कात आले. प्रथम प्रखर विरोध करणारे अण्णा आता मात्र पूर्णपणे आपल्या कामाला सहाय्य करतात.

३) एका विद्यार्थ्याच्या वडिलांचे पोट दुखत होते. म्हणून रात्री त्यांनी मला उठवून घरी नेले. दारू पिल्याचा वास येत होता. त्यामुळे मी त्या स्थितीत त्यांना दारू सोडण्याची शपथ घ्यायला लावली व नंतर डॉक्टरांकडे घेऊन गेलो. एवढेच नव्हे तर त्यांचे उपचार आपल्या रुग्णालयात मोफत केले. त्यामुळे दोन महिने ते दारूला शिवले नाहीत. त्यामुळे दोन महिन्यात घरची परिस्थिती एकदम सुधारली पण नंतर मात्र त्यांच्याशी या विषयासंदर्भात पुरेसा संपर्क ठेवता आला नाही.

७) हरियाणातील एक जाट मुलगा पाचवीत शिकत आहे, त्यांच्याकडे शंभुजी पुराणिकांना जेवायला घेऊन गेलो. तेव्हा त्यांच्याकडे भांडणे सुरू होती. त्यांचे वर्णन शंभुजी 'जुन्या काळची लढाई' असे करतात. दारू पिलेल्या वाल्मिकी समाजातील काही लोकांनी आम्हाला हाकलून दिले. त्यामुळे न जेवताच परतावे लागले. नंतर मात्र सर्वांचे एकत्रिकरण करून शंभुजींनी विषय मांडला. तेव्हा नानकदेव नकोत वाल्मिकी ऋषी हवेत असे म्हणून वाद घातला. पण नंतर जेव्हा चरणजितसिंग ग्रंथी आले तेव्हा सर्व लोक प्रवचन ऐकायला उपस्थित होते.

नंतर ग्रथीजींनी त्यांच्याकडे चहा-पान केल्यानंतर मात्र ते विचारू लागले की "गुरुद्वारात आपण केव्हा जायचे?" असाही तीन महिन्यात बदल घडत आला.

८) पुष्पाताई नडे येऊन गेल्यानंतर वस्तीतील सतिश शिरसाटची आई म्हणाली की तुम्ही जर पुण्याच्या वर्धिनीसारखे काम करणार असाल तर माझ्या मुलाबरोबर दोन मुलींसुद्धा तुम्हाला देऊन टाकल्या.

वर्गाचा आर्थिक प्रश्न सोडविण्यास १२ दाते शोधायला हवे आहेत की जे वर्षाला येणारा १० ते १२ हजाराचा खर्च भरून काढतील . त्यांचा शोध घेणे हे सर्वात मोठे काम वर्गासमोर आहे.

लहुजी वस्ताद साळवे, आरोग्य केंद्रावर सध्या तरी कमी मुलांवर जास्त प्रयत्न करून तेथीलच कार्यकर्ते लवकरात लवकर तयार करण्यावर भर दिला जात आहे. परंतु तेथे दौलत लोखंडे सोडला तर कोणीही नियमित नाही. त्यात विश्वास, परोपकारी व कैलास घुगे हे तिघेही एका -आड- एक आठवडा येत असतात.त्यामुळे मुलांकडे दैनंदिन कार्यक्रम

घेण्यासाठी अजूनही एका कार्यकर्त्याची आवश्यकता आहे. तसेच सध्या कामात असलेले कार्यकर्ते दिवसातील कमीत कमी ४ ते ५ तास ह्या वर्गासाठी देत असतात. त्यात ३ तास वर्ग एक तास तरी किमान संपर्क, चर्चा यासाठी जातो. परंतु रोज अथवा आठवड्यातील काही दिवस देणारे शिक्षक अथवा घरी थोडासा अभ्यास करून शिकवायची तयारी असणारा १० वी पास कोणीही मुलगा यांची संख्या वाढवावी लागेल. तसेच मुलांना सुट्टीत काही काम देऊन त्यातून मिळालेल्या पैशातच त्यांनी शालेय साहित्य घ्यावे, यासाठी काही छोटी छोटी कामे शोधावी लागतील. तसेच चरित्र अथवा अन्य विषय मांडण्यासाठी, गोष्टी, कथा सांगण्यासाठी वक्ते हवे आहेत. तसेच शालेय ग्रंथाबरोबरच काही इतर संदर्भ ग्रंथ व सामाजिक पुस्तके मिळाल्यास मुलांच्यावर तसे संस्कार होऊ शकतील.

एक विशेष उल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे शहरातील संगणक क्षेत्रातील नामवंत अभ्यासू संजू सेठ यांनी वर्गावरील मुलांना संगणक मराठी भाषेत समजावून सांगितला. तसेच मुले संगणकाशी बुद्धीबळ खेळले व नंतर संगणकावर रचलेल्या संगणक युगातील कथा सांगितल्या. हा कार्यक्रम सायंकाळी ६ ते ११ वाजेपर्यंत चालला होता. मुलांचा उत्साह पाहून संजू सेठ पुन्हा येण्याचे निश्चित ठरवून गेले आहेत.

***

## रात्रीच्या गर्भातच उद्याचा असे उषःकाल

— कॅ. सनत्कुमार भाटे

आपल्या देशांत खूप फिरल्यावर आणि अनुभवल्यावर मनात एक निराशाच निराशा निर्माण झाली होती. नवीन पिढी पाश्चिमात्यांचे आंधळे अनुकरण करीत होती (नि आहे.) त्यांच्या शिस्तीचे, कसून काम करण्याच्या वृत्तीचे सामाजिक आणि वैचारिक कर्तव्यांना जागण्याच्या भावनेचे कुणीच अनुकरण करीत नव्हते. मात्र त्यांचा वरवर दिसणारा उथळपणा आणि उधळेपणा फक्त सर्वांना भावत होता. आपल्या संस्कृतीबद्दल आणि पारंपरिक शक्तींबद्दलचा अनादर आणि अनास्था पाहिली की उबग यायचा. सारीकडे अंधारच दिसत होता. हीच का आपली किंमत? अशीच अधोगती होत राहिली तर पुढच्या पिढीचं कसं होणार? सर्वच होतकरु, हुशार देश सोडून जाऊ



लागले तर देशाचं-समाजाचं कसं होणार? असे अनेक विचार मनांत यायचे. मित्र-मंडळीत चर्चा केली की सर्व कारणांचा उहापोह व्हायचा. पण आपण एकटे काय करणार? अशीच

सर्वांची धारणा. आपल्या कुटुंबाच्या नि मित्रपरिवाराच्या बाहेर आपल्या काही जबाबदाऱ्या आहेत. हे कोणी मानतच नव्हतं. . . . मानत असेल तर जडत्व इतकं की ते वाकत नव्हतं... सारीकडे अंधारच अंधार!

अशा अंधारात चाचपडत असताना 'स्व'-रूपवर्धिनीच्या मिणमिणत्या पणतीनं १९९१ साली एकदम प्रकाशाचा किरण दाखवला. लहान प्रमाणात का होईना पण प्रयत्न केला तर समाजातील सर्व थरांपर्यंत पोहचून, त्यांना त्यांच्या आतील खऱ्या शक्तीची जाणीव करून देऊन आपण अजूनही दलदलीत कमळ उगवू शकतो. हे किशाभाऊ पटवर्धन सरांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मला दाखवून दिलं.

मी व्यापारी जहाजाबद्दल आणि तीस वर्षांच्या जग प्रवासांतील अनुभवांबद्दल चार गोष्टी 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांना सांगण्यासाठी गेलो होतो. भाषणानंतर जी प्रश्नोत्तरे झाली. त्यानं मी चकित झालो. घरी येऊन पुन्हा झाल्या अनुभवांचा रवंथ केला नि डोळ्यात पाणी आलं. सारंच काही हरवलेलं नाही याची खात्री पटली. शाळे व्यतिरिक्त बाहेर मिळालेल्या २।। - ३ तासांत वेगवेगळे संस्कार करून आपण माणसं घडवू शकतो. नवी खंबीर पिढी उभी करू शकतो; हे 'स्व'-रूपवर्धिनीनं मला दाखवून दिलं.

विद्यार्थी वसतिगृह आणि योजना अनेक आहेत. पण समाजानं केलेल्या मदतीचं ऋण आपल्याला फेडायचं असतं ही जाणीव प्रत्येक विद्यार्थ्यात रुजवणाऱ्या संस्था फारच थोड्या. . . मी स्वत: तरी ही एकच पाहिली आहे. आपल्यापेक्षा कमकुवत असलेल्यांना मदत करण्याची सवय इथे लहानपणापासून लावली आहे. समाजातील सर्व थरांशी संपर्क कसा साधायचा, योजनाबद्ध पद्धतीनं शैक्षणिक-सांस्कृतिक कार्यक्रम कसे पार पाडायचे याचं बाळकडू इथं दिलं जातं. विविध क्षेत्रातील अनुभवी लोकांना इथं बोलावलं जातं आणि त्यांच्या क्षेत्रातील अडी-अडचणींची अनुभवांची जाणीव मुला-मुलींना करून दिली जाते. इतर विविध समाज-सुधारक प्रकल्पांना भेटी दिल्यानं विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि ते त्यांच्या कर्तव्याविषयी जागरुक राहतात.

'स्व'-रूपवर्धिनीनं आपल्या युवक युवतींना त्यांच्यातील शक्तींची जाणीव करून दिली आहे. पुढारी आकाशातून टपकत नाहीत. . . ते सर्वसामान्यांतून घडवावे लागतात. उभे करावे लागतात. हे 'स्व'-रूपवर्धिनीनं सर्वांना पटवून दिलं. माझी खात्री आहे की इथे घडलेली माणसे समाजात जिथे जातील तिथे आपलं वैशिष्ट्य जाणून आपल्या अवती भोवतीच्यांत जागृती निर्माण करतील आणि आपापल्या परीनं समाजाचं ऋण फेडतील

'स्व'-रूपवर्धिनीच्या ह्या पणतीत 'वणवा' पेटवण्याची ताकद आहे हे मला भावलं आहे. . . . अजून पुढची वाट जरी बिकट असली तरी पटवर्धन सरांनी दाखवलेली दिशा खरी आहे. त्यांच्या या प्रकल्पाला माझा सदैव हातभार लागावा असे माझे देवाकडे मागणे आहे.

---

*व्यापक होणे - विस्तारणे ही चैतन्याची खूण आहे. आपल्याला चैतन्यपूर्ण राहायचे असेल तर जगात सर्वत्र गेले पाहिजे. ज्याक्षणी ही विस्ताराची ऊर्मी थिजेल त्या क्षणी मृत्यू ठरलेलाच आहे.*

— स्वामी विवेकानंद

# 'स्व'-रूपवर्धिनी एका दृष्टीक्षेपात

**(१) सायंकालीन शाखा — एकूण आठ**
रामकृष्ण, विवेकानंद, अखंडानंद, सुबोधानंद, भगिनी निवेदिता, समर्थ रामदास, चंद्रशेखर आझाद, वीर अभिमन्यू (बालशाखा)
एकूण विद्यार्थी-विद्यार्थिनी :
५ वी ते १० वी (७ शाखा) — ३५०
१ ली ते ४ थी (१ शाखा) — ७०

**(२) पाकोळी (बालवाडी)** वयोगट २।। ते ५ या वर्षांची संख्या २४० आतापर्यंत बालवाडी प्रशिक्षित ६०० विद्यार्थी

**(३) आजोळ प्रकल्प** (५ वी ते ७ वी)
सध्याची संख्या — ६०

**(४) शारदामणी महिला विभाग :**

| | शिक्षण विभागाचे नाव | लाभार्थी महिला सध्याची संख्या | आतापर्यंत एकूण लाभार्थी महिला संख्या |
|---|---|---|---|
| १) | शिवण वर्ग | २५ | ९०० |
| २) | गृहशुश्रुषा वर्ग | ३१ | |
| ३) | मशिन वीणकाम | १० | |
| ४) | प्रौढ साक्षर वर्ग | ७० | |
| ५) | माता बाल संगोपन व औषधोपचार केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र (के. ई. एम्. रुग्णालयाच्या सहकार्याने आठवड्यातून दोनदा) | ६० (रुग्ण संख्या प्रत्येक दिवशी) | ८०० |
| ६) | कुटुंब व कायदेशीर सल्ला केंद्र (भारतीय स्त्रीशक्तीच्या सहकार्याने एकूण हाताळलेल्या केसेस) | १२ | |
| ७) | उद्योग शिक्षण (शिवण, गृहशुश्रुषा इ.) शिक्षण मिळाल्यानंतर स्वावलंबी होऊ शकलेल्या गरजू महिला/ मुलींची संख्या | | ३०० ते ३५० |
| ८) | पूर्णकालीन कार्यकर्ते | | ३ |
| ९) | सर्व प्रकल्पामधून लाभ घेणाऱ्या एकूण लाभार्थींची सध्याची संख्या | | १००० |

# न रुळलेली वाट

॥ जय श्रीराम ॥

प्रिय मित्र,

आपली भेट तर रोजच होते आणि 'स्व'-रूपवर्धिनीचे रोजचे काम संपल्यावर घरी जाताना चौका-चौकात होणाऱ्या गप्पाही रोजच्याच. या गप्पांना तसं विषयाचं बंधन राहत नाही. दिवसभरात घडलेल्या एखाद्या प्रसंगापासून ते सिनेमा-नाटकापर्यंतचे सर्व विषय त्यात येतात. एखादं रंगलेलं गाणं समेवर यावं, तशा आपल्या गप्पा कळत-नकळत वर्धिनीच्या विचारांशी येऊन थांबतात. तुझ्या-माझ्यातला होणारा हा संवाद प्रकटरूपाने मांडावा, असं खूप दिवसांपासून मनात आहे. खरं तर हा संवाद 'स्व'-रूपवर्धिनीत येणाऱ्या सर्वच वर्धकांमधला आहे. त्याचं प्रतिबिंब यात उमटावं.

प्रेमाच्या अधिकारानं तू त्या दिवशी माझ्यावर रागावलास. 'एवढा शिकला पण काही अक्कल नाही.' असं एक वाक्य तुझ्या तोंडातून निघालं. . . थोडंसं वाईट वाटलं. तो संवाद तिथेच थांबला. पण मनात मात्र विचारांचं वादळ निर्माण झालं. 'स्व'-रूपवर्धिनीचं काम करता करता लौकिक शिक्षण चांगल्या तऱ्हेनं पार पडलं. एवढ्या शिक्षणावर व्यावहारिक जगात नक्कीच यशस्वी होण्याचा विश्वास आहे. 'स्व'-रूप-वर्धिनीच्या गेल्या पंधरा वर्षात तुझं आणि माझं रोजच शिकणं चालू आहे. हे शिक्षण तर अधिक मोलाचं आहे. तेव्हा काहीच शिकलो नाही असं कसं होईल?

अधिक विचार करता असं लक्षात आलं, की हा प्रश्न तुझ्या तोंडातून निघाला असला तरी, हा व्यावहारिक जगाचा प्रश्न आहे. हे आणि असे असंख्य न विचारलेले प्रश्न असू शकतात. असे सर्व प्रश्न मुळात 'स्व'-रूपवर्धिनी कशासाठी? या मूळ प्रश्नाशी जाऊन भिडतात. याला उत्तर गेल्या पंधरा वर्षांच्या वाटचालीनं दिलं आहे. परंतु काम अधिक चांगलं, दीर्घकाळ, व्यक्तिनिरपेक्षपणे चालण्यासाठी कामाचं तत्त्वज्ञानसुद्धा मांडायला हवं. 'भाग्यासी काय उणे रे, वीर तत्त्वज्ञ कार्यकर्त्यावाचून राहिले.' यानुसार 'स्व'-रूपवर्धिनीच्या विचारांचं ग, म, भ, न रेखाटण्याचा हा प्रयत्न. अर्थात ही सुरुवात आहे; त्याचा विस्तार करण्याचं काम जाणत्यांचे आहे.

जोनाथन नावाचा एक समुद्रपक्षी डोळ्यासमोर उभा राहिला. केवळ खायला मिळण्यासाठी उडावं, यापेक्षा उडण्यातील खरा आनंद त्याला घ्यायचा होता. त्यातील नवीन नवीन प्रकार शिकायचे होते. परंतु त्याला सर्वांचं एकच सांगणं होतं. . . 'Afterall you can't eat a glide' तू काही हवेत मारलेला सूर खाऊ शकत नाहीस. पण जगण्याचा एवढाच मर्यादित अर्थ त्याला मान्य नव्हता. स्वत:चं आयुष्य जगता जगता त्यापलीकडे जाण्याची त्याची धडपड होती. लेखकानं हे पुस्तक अनेकांच्या मनात लपलेल्या 'जोनाथन'ला अर्पण केलं आहे. 'स्व'-रूपवर्धिनीची धडपड याच प्रकारातील आहे. तरुणांच्या हृदयातील जोनाथन जागा करण्याचा हा प्रयत्न आहे.

मर्यादित स्वार्थात न अडकता कुटुंब - परिसर - देशाचा स्वार्थ आपला मानणारी पिढी उभी करणं यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी आहे. बाकीचं काहीच जमत नाही; म्हणून हे काम करावं, असा प्रकार इथे मान्य नाही. उत्तमतेची कास धरावी, स्वत:चं करियर उच्च दर्जाला न्यावं, परंतु स्वदेश-स्वबांधवांचा विसर पडू नये, अशी इथली शिकवण आहे. स्वातंत्र्यवीरांच्या आदर्शाप्रमाणे –

गुणसुमने मी वेचियली या भावे
की तिने सुगंधा घ्यावे,
जरी उद्धरणी व्यय न तिच्या हो साचा
हा व्यर्थ भार विद्येचा!

यासाठी विद्येची क्षेत्रे पादाक्रांत करावी, नवीन-नवीन पराक्रम करावेत, परंतु सर्व काही मातृभूच्या चरणी अर्पण करावे, यातच 'स्व'-रूपाचे खरे वर्धन आहे.

जे जे सुकुमार आहे, तेजपूर्ण आहे ते ईश्वराला अर्पण करावं असं श्रृतीवचन आहे. देवाच्या पूजेला सुकलेली फुले चालत नाहीत. तेव्हा देशाचं काही काम करावं, ते उमेदीच्या काळात, असा आग्रह आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आयुष्यभर, किमान उमेदीची काही वर्षे अशासारखं काही काम करावं, याला प्राथमिकता आहे. 'अशासारखं' हे मी जाणीवपूर्वक म्हटलं आहे. कारण 'स्व'-रूपवर्धिनी हे देशसेवेचं एक साधन आहे. या साधनाचा अभिनिवेश असून चालणार नाही. ज्याला काम करायचं आहे, त्याच्यासाठी क्षितिज मोकळं आहे. देशापुढे असंख्य प्रश्न उभे आहेत, आपल्या क्षमतेनुसार त्यांना जाऊन भिडावं. मात्र करू ते काम देशहिताचे असेल याची काळजी घ्यावी. 'स्व'-रूपवर्धिनीने आपल्याला त्याचाही मंत्र शिकवला आहे. एकट्याने काम करताना थकायला होतं, निराशा येऊ शकते. तेव्हा जेथे जाऊ, तेथे साथी-सोबती गोळा करावेत, राष्ट्र विचारांना अनुकूल संघटना उभी करावी. केवळ सेवेसाठी सेवा हे आपल्याला मान्य नाही. काम सातत्याने चालण्यासाठी या सेवेतून सेवेकरी उभे राहायला हवेत. घेणारे हात देणारे व्हायला हवेत, असा निदान प्रयत्न असायला पाहिजे.

'स्व'-रूपवर्धिनीचे काम मी काय किंवा तू काय या भावनेतूनच करतो. अक्कल आली आहे पण थोडी वेगळ्या प्रकारची. तुझ्या प्रश्नातून मला भावी आयुष्यातील अस्थिरतेचा, असुरक्षिततेचा थोडा आभास जाणवला. परंतु त्याची काळजी करण्याचं खरंच काही कारण नाही. सध्याचं जग असं आहे की, ध्रुवालासुद्धा अढळपद मिळणं कठीण व्हावं. झपाट्यानं बदलणाऱ्या या जगाचं अस्थिरपणा, असुरक्षितता हेच तर वैशिष्ट्य आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक आयुष्यात ती कायम राहाणारच. त्याला तोंड द्यावे लागणारच. त्याच्याशी सामना करण्यासाठी पुरेसा आत्मविश्वास व आवश्यक साधनं 'स्व'-रूपवर्धिनीने आपल्या भात्यात भरली आहेत. लहानपणी आपण कशीही टाकली तरी आपल्या पायावर उभी राहाणारी फुग्याची बाहुली पाहिली आहे. 'स्व'-रूपवर्धिनीचे शिक्षण हे असं आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात, कोणत्याही परिस्थितीत टाकलं तरी आपण बाहुलीसारखे पायावरच उभे. तेव्हा हे शिक्षण काय प्रकारचं आहे; हे 'स्व'-रूपवर्धिनीत सध्या शिकत असलेल्या वर्धकांसाठी व त्यांच्या पालकांसाठी शब्दात मांडणं गरजेचं आहे. ते माझ्यापेक्षा तुझ्या व अन्य युवकांच्या वागण्या-बोलण्यातून प्रत्यक्ष अनुभवांवरून अधिक चांगल्या प्रकारे सांगता येईल. तेव्हा 'योगक्षेमं वहाम्यहं !' हे 'स्व'-रूपवर्धिनीचे 'कृष्ण' वचन लक्षात ठेवायला हरकत नाही.

तुझी आणि माझी प्रथम ओळख 'स्व'-रूपवर्धिनीतच झाली. वेगवेगळ्या शाळेत जाणारे असे अनेक जण मैदानावर एकत्र आलो. प्रत्येकाचा स्वभाव, प्रवृत्ती वेगळी; अशा सर्वांची एकत्र मोट बांधणं कठीण. पण इथले शिक्षक कधी प्रेमाने, कधी रागावून, तर कधी न बोलतासुद्धा प्रत्येकाची समजूत घालायचे त्यातूनच हळूहळू मने जवळ आली. मैत्रीचे बंध अधिक घट्ट झाले. आनंदी आणि निकोप स्पर्धेचे असे ते वातावरण होते. Man is known by the company he keeps. अशी एक म्हण आहे. अनेक हुशार मित्रांची संगत इथे मिळाली. त्यातून आपण आणखी काही करून दाखवावं, नवीन काही करून दाखवावं अशी धडपड होती. स्पर्धेत टिकायचे असेल तर लहान रेघ न पुसता, त्याहून मोठी गुणांची रेघ काढावी हे आपण इथेच शिकलो. तेही अगदी सहजपणे. आपण काही शिकतो आहोत, हे लक्षातही न येता अनेक गोष्टी शिकलो. कदाचित यालाच अनौपचारिक शिक्षण म्हणत असावेत.

सुरुवातीला अनेकजण बोलायला घाबरायचे. पण कधी शिक्षकांबरोबर, मित्रांबरोबर संपर्काला गेल्यानंतर ते इतरांशी कसे बोलतात, काय बोलतात हे पाहून तेही सहजपणे मित्रांशी, आपल्यापेक्षा मोठ्यांशी अधिक चांगला संवाद साधू लागले. गटचर्चेमध्ये बोलताना आपलं चुकलं तर कोणी हसेल याची चिंता न करता आपली मते स्पष्टपणे मांडण्याची सवय त्यातून लागली. त्यात शिक्षकांचा आग्रह असायचा की केवळ ओठातून शब्द

न येता हृदयातून शब्द यावेत. त्यातील प्रामाणिकपणा जास्त महत्त्वाचा. या सगळ्या तयारीतून काही जणांनी वक्तृत्वस्पर्धेतून पारितोषिकांची लयलूट केली तर काहींनी चांगल्या विचारांच्या प्रसारासाठीच त्याचा उपयोग केला. खरं तर हे अगदी साधं असं तंत्र आहे. पण याचा उपयोग मात्र खूप आहे. इयत्ता सातवीतील वर्धक न घाबरता शाळेच्या मुख्याध्यापकांशी जाऊन बोलतो आणि स्वत:च्या गुणांवर प्रवेश मिळवतो, हे यातूनच घडतं. एका मोठ्या कंपनीच्या मुलाखतीमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकापेक्षा येथील युवक सरस ठरतो, हे यातूनच घडतं.

अशी अनेक तंत्रे आणि मंत्र आपण येथे शिकलो आहोत. त्याची यादी करणं अवघड होईल. पहिल्यांदा आपण इथे आलो ते खेळांच्या आकर्षणाने, परीक्षेत अधिक चांगले गुण मिळवता येतील या ईच्छेने. आजही अनेक पालक आपल्या मुलांना पाठवतात ते याच भावनेने. तसं पूरक वातावरणही येथे आहे. त्यातून आपण शाळांच्या, महाविद्यालयांच्या संघांचे चांगले नेतृत्व केले. परीक्षांमध्ये चांगले गुण घेतले. काही आपापल्या विषयात प्रथम आले. पण हे पुरेसं नाही; हे आपल्याला इथल्या कार्यक्रमांतून जाणवलं. केवळ परीक्षेकरता अभ्यास करण्यापेक्षा त्या त्या विषयातील अधिक ज्ञान मिळविण्याचा आग्रह धरला गेला. त्यामुळे अभ्यास कंटाळवाणा न होता, आनंद मिळविण्याचा एक मार्ग बनला. उत्तमतेची साधना करतानाही संवेदना जागी ठेवण्याचा इथे प्रयत्न होता. त्यामुळे आपण शिकलं पाहिजे. पण केवळ स्वत:साठी नाही तर समाजाला, देशाला भेडसावणाऱ्या असंख्य प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी, याचं भान आलं. कदाचित आपली शक्ती अपुरी पडेल, तर अधिक शक्ती, संघटीत शक्ती मिळविण्यासाठी सर्व तऱ्हेची अभ्यास, नियोजन, व्यवस्थापन व नेतृत्व कौशल्ये आवश्यक आहेत, ती मिळवली पाहिजेत, याची जाणीव झाली.

या सर्वांतून 'स्व'-रूपवर्धिनी केवळ निवडक, बुद्धिमान मुलांसाठी का? या प्रश्नाचा उलगडा होत राहिला. प्रत्यक्ष काम करताना खूपदा जाणवतं की बुद्धिमान मुलांना हाताळणं ही अनेक घरांची, कदाचित शिक्षकांची सुद्धा समस्या आहे. त्यातून ती वाकड्या वळणाला लागू शकतात. ही बुद्धिमत्ता योग्य कारणी लावणं, हे 'स्व'-रूपवर्धिनीचं काम आहे. अर्थात ज्या ठिकाणी अडचणी अनंत आहेत, पोषक असे वातावरण नाही, अशा परिसरातून ही उपेक्षित बुद्धिमत्ता वेचून काढून त्याला सुयोग्य वातावरण पुरविण्याचं हे काम आहे. समाजाच्या सर्व स्तरातील मुलं इथे यावीत असा प्रयत्न आहे.

या संदर्भात सरांचे एक वाक्य नेहमी आठवतं. ज्याच्याजवळ गुणांचं भांडार अधिक, तो इतरांना काही देऊ शकतो. अशी शक्ती आणि प्रवृत्ती उभी करण्याचं हे काम आहे. थोड्या वेळात अभ्यास आणि व्यवसायाला न्याय देऊन अन्य सर्व वेळ समाजासाठी देणारी पिढी आपल्याला घडवायची आहे. अशी उदाहरणे आज 'स्व'-रूपवर्धिनीत नक्की आहेत. त्यांची संख्या प्रयत्नांच्या मानाने कमी आहे. याची बोचही मनात आहे. परंतु यातूनच काही उभे राहण्याचा विश्वास आहे. ज्ञानेशाचे, चैतन्याचे आदर्श त्यातून उभे राहतील. तोपर्यंत हे काम अधिक जोमाने, अधिक वेगाने करूयात. स्वातंत्र्यवीरांचा संदेश मनात जागवूयात.

**की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने**

**लब्ध-प्रकाश -इतिहास निसर्गमाने**


**जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे**

**बुद्ध्याची वाण धरिले करी हे सतीचे ।।**

*तुझा,*

**संजय**

## 'त्यांची' कथाच वेगळी



गुणी आणि गरजू महिलांना उद्योग विषयाचे शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या हेतुने वर्धिनीच्या शारदामणि महिला विभागातर्फे अनेक अभ्यासक्रम राबविले जातात. गृहशुश्रुषा वर्ग हा यातीलच एक. या वर्गासाठी किमान ८ वी पर्यंत शिक्षण झालेल्या, १८ वर्षांवरील महिलांना प्रवेश मिळतो. आजपर्यंत सुमारे ३०० महिलांनी या प्रकारचे शिक्षण घेऊन स्वत: स्वावलंबी होत होत आपल्या घरालाही आधार देण्यात यश मिळविले आहे. या अभ्यासक्रमासाठी येणाऱ्या अनेक महिला वेगवेगळ्या समस्यांचा मुकाबला करीत असतात. त्यातीलच हे चार अनुभव –

**(१) काय भुललासी वरलिया रंगा :**

एक महिला दोन मुलींना घेऊन आईकडे राहते. अपघातामुळे वडिल लवकर निवृत्त झालेले. एका नातेवाईकांच्या सांगण्यावरून कोणतीही विचारपूस न करता केवळ मुलगा देखणा आहे म्हणून त्याच्याशी तिचा विवाह लावला. ही त्या गृहस्थाची दुसरी पत्नी. हा 'देखणा' नवरा कोणताही कामधंदा करीत नव्हता. सासरच्या जीवावर खात जीवन जगणारा, प्रसंगी पैसे कमी पडले तर मारहाण करणारा, सहन होण्यापलीकडे परिस्थिती गेल्यावर ती आपल्या आईवडिलांकडे परत आली. परंतु तिचे परत येणे तितकेसे पसंत नव्हते. घरच्यांना परिस्थिती पटवून द्यायलाही तिला खूप त्रास झाला. वर्धिनीच्या गृहशुश्रुषा वर्गाचे प्रशिक्षण घेऊन ती स्वत:च्या पायावर उभी राहिली. आपली बायको चांगले पैसे मिळवते हे समजल्यावर तिच्या 'देखण्या' नवऱ्याने तिच्याकडे चकरा मारायला सुरुवात केली. मधल्या कालावधीत त्याने तिसरा विवाह केला. आता तिला धमक्या देणे वाढले. तिच्या मुली वर्धिनीच्या बालवाडीत येतात. घरच्या सर्व समस्या सोडवताना तिला वर्धिनीचा खूप आधार मिळाला आहे आणि त्याच आधारावर खंबीरपणाने उभी राहत आहे. नवऱ्याच्या धमक्या व चकरा थांबवण्यातही वर्धिनीचे तिला सहाय्य झाले आहे.

*हार्दिक शुभेच्छा !*

**मे. रमणलाल ट्रेडिंग कंपनी**

१८०, भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे ४११ ००२.

☎ घर : ६५६९६८ ऑफिस - दुकान : ६५७९४७

**नारळ, मिरची व किराणा मालाचे दलाल**

**(२) घार हिंडते आकाशी –** अशीच एक महिला इतरांचे अनुभव लक्षात घेऊन वडिलांनी हिचा विवाह आपल्याच बहिणीच्या मुलाशी म्हणजे भाच्याशी करून दिला. आता आपल्या मुलीची काळजी नाही असे वाटत होते परंतु 'भाच्याचा' जावई झाल्यावर पैशाची मागणी पूर्ण करता आली नाही म्हणून या मुलीला सासू व नवरा दोघांचा छळ सहन करावा लागला. त्यातच पहिले अपत्य झाले. छळाला कंटाळून ही माहेरी आली. वर्धिनीच्या गृहशुश्रुषा वर्गाचे प्रशिक्षण पूर्ण केले. आता स्वतःच्या पायावर खंबीर उभी आहे. पण तरीही आनंदी नाही. कारण नवरा तिच्या मुलाचा ताबा तिच्याकडे देत नाही.

**(३) कशी नशिबाने थट्टा आज मांडली !** घरातील मोकळ्या वातावरणामुळे आणि आईने नकळत दिलेल्या प्रोत्साहनामुळे एक मुलगी एका मुलाबरोबर हिंडू फिरू लागली. त्याच्या घरीसुद्धा राहिली. तिला ठाम विश्वास होता की हा मुलगा आपल्याशी नक्की विवाह करणार. परंतु अधिक हुंड्याच्या मोहापायी त्याने लाथाडले. जगण्यातला आत्मविश्वास हरवला. गृहशुश्रुषा वर्गात दाखल झाली. आयुष्यात घडून गेलेल्या चूका विसरून नव्याने जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहे.

(४) लग्न झाल्यावर नवरा त्रास देऊ लागला म्हणून कंटाळून घरी परत आलेली अशीच एक मुलगी घरी वडिलांनी परिस्थिती समजावून घेऊन मार्ग काढण्याऐवजी घरी परत आलेल्या आपल्या मुलीलाच जगणे कठीण करून ठेवले. मनाचा हिय्या करून गृहशुश्रुषा वर्गाला आली परंतू वडिलांनी धमकी दिली की कोर्स पूर्ण झाल्यावर घरातून बाहेर पडलीस तर तंगडी तोडीन. त्याही परिस्थितीत तिचे मनोबल टिकवून तिला कोर्स पूर्ण करायला लावला. वडिलांशी बोलण्याचे धाडस तिच्यातच निर्माण झालं. वडिलांची परवानगी मिळवून आज परगावी स्वतःच्या पायावर उभी आहे. सुखात आहे.

★★★

## आवाहन

*'स्व' रूपवर्धिनीचे काम ज्या दिवसापासून सुरू झाले अगदी त्या दिवसापासून म्हणजे १३ मे १९७९ पासून वर्धिनीच्या कार्यकर्त्यांचा हा अनुभव आहे की समाज हा चांगल्या कामांना उचलून धरतो. गरजेप्रमाणे पैसेही कामाला उपलब्ध होतात. काम सुरू झाले त्यावेळेस किंवा त्यानंतरही कित्येक वर्षे स्वतःची जागा, स्वतःची वास्तु असावी किंवा होईल असे कोणाच्यास्वप्नातही नव्हते. परंतु तशी गरज निर्माण झाली आणि समाजही पाठीशी उभा राहिला. वर्धिनीच्या रिकाम्या धनाच्या पेटीत समाजाने अक्षरशः पैशाचा पाऊस पाडला. पाहाता पाहाता कोणत्याही कर्जाशिवाय किंवा सरकारी अनुदानाशिवाय वर्धिनीची स्वतःची पाच मजली वास्तु उभी राहिली. काम दिवसेंदिवस वाढतच होते आणि वाढतच राहाणार कारण कार्याचा आवश्यकतेनुसार विस्तार होणे हे कामाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. विस्तार झाला, व्याप वाढला की आर्थिक चिंताही तेवढीच वाढते. ही वाढती आर्थिक गरज जितक्या लवकर भागली जाईल तितक्या लवकर कार्यकर्त्यांना उद्दीष्ट गाठण्याच्या मूलभूत कामाकडे अधिक वेळ देणे शक्य होते. आर्थिक सहाय्याबरोबरच आपण ज्या ज्या प्रकारचे सहाय्य वर्धिनीच्या कामाला कराल त्याची नितांत गरज आहे.*

## शिक्षण – प्रवासाचा एक टप्पा

*शिक्षण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. पुस्तकाबरोबरच पुस्तकाबाहेरही शिकायला खूप मिळते. शालेय (टक्क्यांसाठीचा) अभ्यास या दृष्टीकोनातून वर्धिनीतील विद्यार्थ्यांना नक्कीच काही शिकवले जाते पण ते सारे म्हणजे फक्त शिक्षण नाही याची जाणीव काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात ठाम आहे. नवे प्रश्न, नव्या समस्या कामातील अडीअडचणी या साऱ्यातूनही शिकायला मिळते तसे इतरांचे अनुभव त्यांचा पराक्रम, त्यांची जिद्दजिगर, तडफड ही सुद्धा मनाला भावून जाते. शिबिराच्या निमित्ताने नवे विषय समजावून घ्यावे, नवा संकल्प मनोमन करावा, सहलीच्या निमित्ताने जंगले, रानवाटा, गडकोट पायी तुडवताना पराक्रमाची शर्थ करणाऱ्या शूरवीरांचा पराक्रम आठवावा. सामुदायिक कृतीमधील शक्ती अनुभवावी, निसर्गाचे चमत्कार डोळेभरून पाहावेत आणि या साऱ्या पार्श्वभूमीवर चार भिंतींच्या आतल्या छोट्याशा जगाची तुलना करावी. . . . मनातील हे सारे तरंग इथे प्रत्येकाला काहीतरी शिकवीत असतात.*

*त्यामुळे वर्धिनीच्या रोजच्या कामात, रोजच्या आखलेल्या कार्यक्रमांबरोबर अन्य अनेक कार्यक्रम, उपक्रम होत असतात. सातत्याने कुणाच्या ना कुणाच्या भेटी, अनौपचारिक गप्पा, बोलणे, सहली, गटकार्ये, शिबिरे, वार्षिक उत्सव, गणेशोत्सव असे अनेक अनेक कार्यक्रम होत असतात. या प्रत्येक कार्यक्रमामुळे खऱ्या अर्थाने काहीतरी शिकायला मिळते हे मात्र नक्की . सोबत गेल्या वर्षभरातील अन्य सर्व कार्यक्रम, उपक्रम, घटना यांचा धावता आढावा –*

***With Best Compliments From :***

**BRITE ELECTROPLATERS**

Tophkhana, Shivajinagar,
Pune - 411 005.

# वर्षभरातील महत्त्वाच्या भेटी

गेल्या वर्षभरात खालील सन्माननीय व्यक्ती आणि संस्थांनी वर्धिनीला भेट दिली.

| | दिनांक | |
|---|---|---|
| १) | १८/१०/९३ | सामाजिक समरसता मंचाचे ४० कार्यकर्ते |
| २) | २२/११/९३ | आसाम प्रांताचे संघप्रचारक श्री. वैद्य |
| ३) | २७/११/९३ | कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य प. पू. जयेंद्रसरस्वती |
| ४) | ५/१/९४ | उद्योगपती श्री. सनत्भाई शाह |
| ५) | ७/१/९४ | पीपल्स पार्टिसिपेशन इन इंडिया या संस्थेतर्फे सौ. व श्री. प्रशांत लिमये |
| ६) | १३/२/९४ | पेंढारकर महाविद्यालय, डोंबिवली येथील उपप्राचार्य श्री. अत्रे आणि श्री. झोडगेकर |
| ७) | ५/३/९४ | कॅनेडियन शिष्टमंडळ |
| ८) | १०/३/९४ | भारतीय शिक्षण संस्थेचे डॉ. देशपांडे आणि त्यांच्या समवेत पु. ग. तथा भैय्या वैद्य |
| ९) | २/४/९४ | १० वी प्रमाणपत्र परीक्षेत महाराष्ट्रात पहिला आलेला कु. मनोज टिळेकर |
| १०) | १४/४/९४ | श्री. व सौ. गुगळे, पाथर्डी |
| ११) | २८/४/९४ | अहमदाबाद येथील संघकार्यकर्ते श्री. देवभानकर व श्री. देव |
| १२) | २९/७/९४ | माता बाल संगोपन केंद्र, सांगोला या संस्थेच्या प्रमुख कार्यकर्त्या |
| १३) | ३/८/९४ | सेवासदन महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थिनी व प्राध्यापिका |
| १४) | २३/८/९४ | मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते श्री. सय्यदभाई |

*With Best Compliments From :*

**M/S. LANDMARK CONSTRUCTIONS**

'Darshan', 1, B. J. Road,
Pune - 411 001. ☎ 627844, 623737

# असे वक्ते . . . अशी व्याख्याने

सामान्यपणे आठवड्यातून एकदा प्रत्येक शाखेवर व्याख्यान, कथाकथन, अनुभवकथन इ. व्हावे अशी कार्यक्रमांची रचना आहे. त्याप्रमाणे अनेक विषय वर्धकांपुढे मांडले जातात. त्यांपैकी काही विषय व ते मांडणारे वक्त खालीलप्रमाणे होते. :

| | असे वक्ते | अशी व्याख्याने |
|---|---|---|
| १) | सौ. बागेश्री पोंक्षे | चित्रफितींद्वारा अरुणाचल दर्शन |
| २) | सौ. संगीता भंडगे | यमगरवाडी महिला शिबिरातील अनुभव |
| ३) | सौ. वसुधा मेहेंदळे | झाशीची राणी लक्ष्मीबाई – चरित्र |
| ४) | श्री. मधुकर अभ्यंकर | हवामान खात्याचे कार्य |
| ५) | श्री. दि. दा. जोशी | मनाची क्षमता |
| ६) | श्रीमती पुष्पाताई नडे | बालग्राममधील कामाचे अनुभव |
| ७) | श्री. पराग जगताप | शास्त्रज्ञ चरित्र |
| ८) | श्री. रामभाऊ कुलकर्णी | छोट्या छोट्या वाक्यातून घडणाऱ्या गंमती |
| ९) | श्री. मिलिंद पुरोहित | पृथ्वीची निर्मिती, तारे व आपण |
| १०) | श्री. मुकेश कणसकर | गांधी वस्तीमधील कामाचे अनुभव |
| ११) | श्री. किशोर करमरकर | ॲल्कोहोलिक ॲनॉनिमसने चालविलेले व्यसनमुक्तीचे कार्य |
| १२) | श्री. बापूराव जोगळेकर | तामिळनाडू प्रांतात सामाजिक काम |
| १३) | श्री. श्रीरंग हरी फडके | गीता आणि तरुण |
| १४) | श्री. मधुसुदन घाणेकर | बे दुणे चकली (मनोरंजनाचा कार्यक्रम) |
| १५) | श्री. वाटवे | सर्प - समज - गैरसमज |

*With Best Compliments From :*

**M/S. METAFIN PROCESSOR**

Tophkhana, Shivajinagar,
Pune - 411 005

# शिबिरवृत्त ९३-९४




चित्रपटाच्या सहाय्याने पाहिल्या-नंतर शिबिराच्या सत्रांमधील उत्सुकता वाढत होती. आहे त्या भौगोलिक परिस्थितीचा शास्त्रशुद्ध रीतीने उपयोग करून घेतला तर अगदी कमीत कमी पावसाच्या क्षेत्रातही १२ महिने धरणीमाता हिरवा शालू कशी नेसू शकते याचे दर्शन राळेगणसिद्धीला भेट दिल्यानंतर घडले.

वर्षभरात एकूण १२ शिबिरे संपन्न झाली. त्यातील काही शिबिरांचा हा आढावा –

**(१) हा काय शिबिराचा विषय आहे ! :**

भूगोल हा विषय एकतर आम्हाला आवडत नाही. नाईलाजाने आम्ही त्याचा अभ्यास करतो आणि शिबिराचा विषय म्हणून तुम्हाला तोच सुचावा? दुसरे चांगले विषय कमी आहेत का?

भूगोल या विषयावर शिबिर होणार हे समजल्यावर आलेली ही प्रातिनिधिक प्रतिक्रिया. प्रत्यक्ष शिबिर संपताना मात्र भूगोलातील सौंदर्याने, चमत्कृतीने शिबिरार्थी अवाक् झाले. वरवर कंटाळवाणा वाटणाऱ्या या विषयात रस घेतला तर किती मजा येते याचा प्रत्यय शिबिरार्थींनी घेतला. निवेदिता शाखा आणि आजोळ प्रकल्पातील सुमारे ५० मुली या शिबिरात होत्या. रांजण खळगे, लवणस्तंभ, पाषाणांचे विविध प्रकार त्यातील सौंदर्य व त्याच्यातील वैशिष्ट्ये हे प्रत्यक्ष पाहिल्यावर आणि नदी निर्माण कशी होते, भूकंप होताना भूपृष्ठाखाली हालचाली कशा होतात. हे सारे

**२) लांब उडी, उंच उडी ! खुंटावरती टिपा गडी ! :**

मुलांमधील क्रीडानैपुण्य लक्षात यावे तसेच क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातूनही देशाचा गौरव वाढविता येतो ही गोष्ट मुलांच्या लक्षात यावी या हेतूने क्रीडाक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने मुलांचे एक क्रीडाशिबिर २१ ते २२ एप्रिल '९४ या कालावधीत संपन्न झाले. एकूण ११० शिबिरार्थी या शिबिरात होते. सर्वश्री राघव अष्टेकर, सुधांशु खैरे, मिलिंद ढवळे, श्री. मथुई, श्री. शिंदे इत्यादि क्रीडाक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी मुलांना मैदानावर आणि व्याख्यानरूपाने मार्गदर्शन केले.

ऑलिंपिक स्पर्धेत पदक मिळवून देशाचा गौरव वाढविणाऱ्या श्री. मनोज पिंगळे तर शारीरिक व्यंगाला कुरवाळत न बसता आपल्या दुचाकीवर खार्दुंगला मोहिम यशस्वी करणाऱ्या श्री. राजेंद्र खंडेलवाल यांचे अनुभवाचे बोल मुलांना खूप काही शिकवून गेले. तसेच या शिबिरामुळे काही युवकांचे व विद्यार्थ्यांचे खेळातील कसब तज्ज्ञ क्रीडाशिक्षकांच्या नजरेत भरले. त्यातील एका तज्ज्ञ शिक्षकाने या

सर्वांना नियमित सराव करण्यासाठी त्यांच्याकडे येण्याचे निमंत्रण दिले.

**३) आईच्या कुशीतून, मित्रांच्या सहवासात :**

अगदी रोज आईच्या कुशीत झोपणाऱ्या वीर अभिमन्यू बालशाखेच्या बालगोपाळांची दोन निवासी शिबिरे १० व ११/११/९३ आणि १८ ते २२ एप्रिल'९४ या कालावधीत संपन्न झाली.

या शिबिरांमध्ये मुले आईवडिलांपासून दूर एकट्याने न रडता राहायला तर शिकलीच पण न कळत स्वावलंबनाच्या चार गोष्टीही शिकली.

आकाश कंदील, कागदी फुले बनवणे, भेटकार्डे बनवणे अशी कृतीसत्रे तर जादुचे प्रयोग, ऐतिहासिक कथा, क्रांतिकारक कथा अशा आवडत्या कार्यक्रमांचाही त्यात समावेश होता.

१८ एप्रिल ते २२ एप्रिल ९४ याच कालावधीत आजोळ प्रकल्पातील मुलामुलींचे एक निवासी शिबिर संपन्न झाले. ओरिगामी सारख्या हस्तकला शिबिरार्थी या शिबिरात शिकले.

**४) 'स्व'-रूपाची ओळख :**

वर्धिनीचे काम सुरू झाले तेव्हा मुलींसाठी स्वतंत्र शाखा काढावी, स्वतंत्र महिला विभाग कार्यरत करावा असा निश्चित आराखडा डोळ्यांसमोर नव्हता. परंतु कामाच्या विस्तारात हळूहळू मुलींची एक स्वतंत्र शाखा उभी राहिली, शारदामणि महिलाविभाग या नावाने वर्धिनीच्या महिला विभागातील वेगवेगळी कामे उभी राहिली आणि हा सारा व्याप सांभाळणाऱ्या ३०-४० युवती व महिला कार्यकर्त्यांचा संच उभा राहिला. या सर्व युवती व महिला कार्यकर्त्यांचे एक शिबिर २२ व २३/८/९४ या कालावधीत संपन्न झाले. समाजपरिवर्तनातील महिलांचे योगदान, कार्यकर्त्यांमधील संबंध (समज - गैरसमज), महिला समस्या - एक भविष्यवेध, वर्धिनीच्या कामामागची प्रेरणा व उद्दिष्ट असे अनेक विषय या शिबिरात मांडले गेले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रा. सौ. सुप्रिया अत्रे, प्रा. कु. रंजना आपटे, प्राचार्य विवेक पोंक्षे, कु. संगीता देशपांडे यांचे सहकार्य लाभले.

**५) अभ्यासे प्रकट व्हावे :**

१० वी मधील वर्धकांसाठी प्रतिवर्षा-प्रमाणे एप्रिल व मे ९४ या कालावधीत अभ्यास शिबिर संपन्न झाले. विषयांच्या अभ्यासतासिकांबरोबरच परीक्षेचे तंत्र, अन्य अभ्यास कौशल्ये याचा सराव या शिबिरात घेण्यात आला. सौ. पाळंदे, श्री. सु. म. जोशी श्री. लोंढे इत्यादी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**६) युवक शिबिर – ८ ते १२ जून १९९४**

**"दोन भुजांच्या नसानसातील**
**त्या शिखरांना ताकद सांगा"**

भ्रष्टाचार, गुंडगिरी, राष्ट्र विघातक

With Best Compliments From :

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp Octroi Naka,
Pune – Satara Road, Pune 411 009. ☎ 431111

अतिरेक्यांच्या कारवाया, घुसखोरी संकटांची मालिकाच्या मालिकाच या देशापुढे उभी ठाकलेली आहे. हे आह्वान पेलण्याची क्षमता ज्या तरुणांच्या मनात असते त्या तरुणांच्या अंगातील रक्त खवळलेच पाहिजे अशी परिस्थिती समोर आहे. वर्धिनीतील युवकांच्या मनात या विषयाबद्दल अस्वस्थता निर्माण व्हावी, कृती करायला त्यांनी आतुर व्हावं अशा प्रकारचे जागरण करण्याच्या हेतूने झालेल्या या शिबिरात आजच्या तरुणांपुढची आह्वाने, संघर्षातील ताकद, पूर्वांचलातील घुसखोरी अशा विषयांचे मार्गदर्शन करण्यासाठी ॲड. नंदू फडके, श्री. गिरीशराव बापट, श्री रामभाऊ डिंबळे, श्री. श्यामराव आपटे हे उपस्थित होते. अर्थात कोणतेही काम यशस्वी करायचे तर त्याला हवे नियोजन व व्यवस्थापन कौशल्य ! अगदी सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांना देखील या विषयाचा विचार करण्याची किती गरज आहे यासंबंधीचे आपले विचार चैतन्य तेंडुलकर या युवक कार्यकर्त्याने सर्वांसमोर मांडले. जे काम आम्ही करू इच्छितो ते यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्व कसे असावे याचे पैलू प्राचार्य वामनराव अभ्यंकरांनी आपल्या सत्रात मांडले. वर्धिनीचे ५० युवक या शिबिरासाठी पूर्णवेळ उपस्थित होते.

## वर्धापन दिन कार्यक्रमवृत्त ९३-९४

**१) अखंडानंद शाखा – २३ ऑक्टोबर ९३**

प्रमुख पाहुणे या नात्याने प्रसिद्ध विधिज्ञ नंदू फडके हे उपस्थित होते. वर्धिनीच्या माणूस घडविण्याच्या कार्याला शुभेच्छा देताना, दाऊद इब्राहिमसारखे देशद्रोही देशात थैमान घालीत असताना राष्ट्रप्रेमी आणि जागरुक नागरिक म्हणून आपल्यापैकी प्रत्येकाने काय करायला हवे यासंदर्भात त्यांनी आपले विचार मांडले.

**२) विवेकानंद शाखा – ४ जुलै १९९४**

प्रमुख पाहुणे या नात्याने बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. अनिरुद्ध देशपांडे हे उपस्थित होते. समाजासमोर उभ्या ठाकलेल्या वेगवेगळ्या समस्यांचा, संकटांचा संदर्भ देत प्रा. देशपांडे यांनी अशा प्रकारच्या संकटांचा- समस्यांचा यशस्वी मुकाबला करण्याचे सामर्थ्य वर्धिनीच्या दैनंदिन शाखेत होणाऱ्या छोट्या छोट्या कार्यक्रमातून लाभते आणि म्हणून प्रत्येकाने या कार्यक्रमांमध्ये मन:पूर्वक सहभागी व्हावे असे आवाहन या प्रसंग केले.

**३) सुबोधानंद शाखा – २८ जुलै ९४**


शाखेचा हा पहिलाच वर्धापन दिन होता. छोट्या छोट्या वर्धकांनी उत्साहाने सर्व तयारी केली. कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रम ऐन रंगात आला आणि अचानक वीज गेली आणि - ----- क्षणभर वाटले कार्यक्रमात व्यत्यय आला परंतु उर्वरीत सर्व कार्यक्रम अंधारातच आणि तोही ठरल्याक्रमाने पार पडला. शिस्तीचा अंगिकार केला तर कोणत्याही संकटावर कशी मात करता येते याचा वस्तुपाठ वर्धकांना या प्रसंगाने मिळाला.

**४)वीर अभिमन्यू बालशाखा–३० जुलै १९९४**

अध्यक्षस्थानी प्रधान शाखा पालक श्री. दि. दा. जोशी तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सनत भाटे हे होते. बालशाखेतील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकांनी मोकळेपणाने त्यांच्या पाल्याच्या होणाऱ्या प्रगतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सनतदा भाटे यांनी या प्रसंगी सांग्रितलेल्या अक्राळ विक्राळ राक्षसाच्या गोष्टीत बाल वर्धक कमालीचे रंगून गेले होते.

## अभिनंदन ! अभिनंदन !! अभिनंदन !!!

- *श्री. दिनकर दामोदर तथा दि. दा. जोशी हे 'स्व' रूपवर्धिनीचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते. गेली कित्येक वर्षांपासून शिक्षक संघटनेचे कुठल्याही पदाची अपेक्षा न करता निष्ठेने काम करणारा कार्यकर्ता, वर्गाबाहेरही विद्यार्थ्यांशी जवळीक साधणारा, त्यांच्यासाठी धडपडणारा एक शिक्षक! भूकंपासारख्या आपत्तीत मदतीसाठी दुर्घटनास्थळी धावून जाणारा एक जागरुक सामाजिक कार्यकर्ता!असे गुण लाभलेली ही व्यक्ती निवृत्तीनंतरही स्वस्थ कशी बसेल? दि. दां. च्या निवृत्तीनंतरही सक्रिय राहाण्याच्या प्रवृत्तीचा सार्थ सन्मान या वर्षी ४ सप्टेंबर १९९४ रोजी मधुसंचय पुरस्काराने झाला.*
- *वर्धिनीत सांगितले जाईल ते काम जबाबदारीने स्वीकारणारा, आपल्या तबला, ढोलकी, मृदुंगावरच्या प्रभुत्वाने मित्रांना थक्क करणारा, महाविद्यालयात स्नेहसंमेलने गाजविणारा, प्रसाद जमखिंडीकर या वर्षी बी. इ. ची परीक्षा विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झाला.*
- *सकाळी ८ ते रात्री ९ पर्यंत सतत काम करीत राहाणाऱ्या वर्धिनीच्या पूर्णकालिक कार्यकर्त्या, पुष्पाताई नडे कामाचा सारा व्याप सांभाळीत सांभाळीत या वर्षी पदवीधर झाल्या. त्यांचे यश हे अर्थातच अनेकांना प्रेरणा देणारे आहे.*



- *मनीषा बोईन, भगिनी निवेदिता शाखेची कार्यकर्ती. महाविद्यालय, दवाखान्यामधील केवळ अनुभव मिळावा म्हणून संध्याकाळची स्वीकारलेली नोकरी सांभाळीत, घरच्या सर्व अडीअडचणींचा हसतमुखाने सामना करीत या वर्षी बी. ए. एम्. एस्. ची परीक्षा उत्तीर्ण झाली अर्थातच आता यापुढे तिचा परिचय – वैद्य मनीषा बोईन !!*
- *निवेदिता शाखेतील दोन वर्धक विद्यार्थिनी कु. रुपाली शेळके आणि शुभांगी पोळ या दोघींना महापौर करंडक स्पर्धेत यश मिळाले. लहान गटात रुपाली शेळके हिला प्रथम क्रमांक तर कु. शुभांगी पोळ हिला मोठ्या तृतीय क्रमांक मिळाला.*
- *संजय शिंदे हा विवेकानंद शाखेचा कार्यकर्ता, तसा मितभाषी पण बोलेल ते ठामपणाने करेल MPSC च्या स्पर्धात्मक परीक्षेत यशस्वी होऊन सरकारी सेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याची संधी त्याला प्राप्त होत आहे.*

## दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्क

**१) रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख — श्री. गिरीश अडके
शाखापालक — श्री. शांताराम हायगुंडे

**२) समर्थ रामदास उपशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख — श्री. सुभाष चलवादी
शाखापालक — श्री. प्रमोद बेहरे

**३) विवेकानंद शाखा**
भारतीय विद्याभवनचे छाब्रिया विद्यालय,
शिवाजीनगर, पुणे १६.
शाखाप्रमुख — श्री. विनोद बिबवे
शाखापालक — श्री. शं. रा. दावके

**४) चंद्रशेखर आझाद उपशाखा**
हुतात्मा राजगुरू विद्यालय,
पांडवनगर, वडारवाडी, पुणे १६.
शाखाप्रमुख — श्री. शिरीष अडके
शाखापालक — श्री. र. ज. नरवणे

**५) अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे ३७.
शाखाप्रमुख — श्री. सचिन चव्हाण
शाखापालक — श्री. राजाभाऊ लवळेकर

**६) सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुण ५२.
शाखाप्रमुख — श्री. निशिकांत वाईकर
शाखापालक — श्री. व. ना. दाते

**७) भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे ११.
शाखाप्रमुख — कु. तेजश्री शेंडे
शाखापालक — श्री. शिरीष पटवर्धन

**८) 'आजोळ'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रमुख — **श्री. जयंत कवठेकर**
संपर्क :
सोम. ते शुक्र. सायं. १ ते ५

**९) शारदामणि महिला विभाग व बालवाडी ('पाकोळी')**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रमुख — **श्रीमती पुष्पाताई नडे**
संपर्क :
सोम. ते शुक्र. स. १० ते १,
शनि. ९ ते १०.३०

**१०) वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखा प्रमुख — **श्रीमती पुष्पाताई नडे**

**११) कार्यालय**
१) **श्रीमती वासंतीताई यादव**
२) **श्री. रामकृष्ण रानडे**, व्यवस्थापक
संपर्क :
सोम. ते शनिवार स. ११ ते ५

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री. ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखा पालक**
**श्री. दि. दा. जोशी**
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे ३७.

House of Forms Pune Phone : 447441

Name of the Public Trust : सार्वजनिक ट्रस्टचे नाव
SWAROOP WARDHINIEE

THE BOMBAY PUBLIC
SCHEDULE IX [Vide Rule 17 (1) ]

## INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE

१९९४ ला संपणाऱ्या

| EXPENDITURE व्यय | Rs. रुपये | Rs. रुपये |
|---|---|---|
| To Expenditure in respect of properties :<br>मालमत्तेसंबंधी खर्च | | |
| Rates, Taxes, Cesses (As per Sch.1)<br>स्थावर कर, कर, सेस | | 1,86,724.69 |
| To Other Expenses (As per Sch. 2)<br>इतर खर्च | | 58,896.05 |
| To Miscellaneous Expenses<br>किरकोळ खर्च | | 1,872.70 |
| To Depreciation (As per Sch. D)<br>अवमूल्यन | | 18,798.71 |
| To Expenditure on objects of the trust (As per Sch. 3)<br>ट्रस्टच्या उद्देशावर केलेला खर्च | | 2,79,102.69 |
| a) Religious अ) धार्मिक | | |
| b) Educational ब) शैक्षणिक | | |
| c) Medical Relief क) वैद्यकीय मदत | | |
| d) Relief of proverty ड) गरिबांस मदत | | |
| e) Other, charitable objects इ) इतर धर्मदाय उद्देशांवर | | |
| Total Rs. एकूण रु. | | 5, 45,394.84 |

* Strike out whichever is not applicable
* गैरलागू खोडून टाकावे.

Dated at : 16 Aug. 1994
दिनांक :

TRUSTEE
ट्रस्टींची सही

TRUSTS ACT, 1950
परिशिष्ट नऊ (नियम १७ (१) पहा)

Registration No. F -1694 - PUNE
रजिस्ट्रेशन नं.

## YEAR ENDING 31ST MARCH, 1994
वर्षाकरिता आय - व्यय लेखा

| INCOME आय | Rs. रुपये | Rs. रुपये |
|---|---|---|
| By Interest [accrued येणे<br>व्याज [realised) वसूल<br>On Bank Account<br>बँक खात्यापासून | | 11,854.00 |
| By Dividend (As per Sch. 5)<br>लाभांश (डिव्हिडंड) | | 54,569.36 |
| By Donations in cash or kind<br>देणग्या, रोख, किंवा वस्तू स्वरूपात | | 1, 46,585.80 |
| By Income from other sources<br>(in details as far as possible) (As per Sch. D)<br>इतर साधनांपासून झालेले उत्पन्न<br>(शक्य तितका विस्तृत तपशील द्यावा) | | 47,435.75 |
| By Audit Fees payabble written back | | 5,200.00 |
| By Deficit carried over to Balance Sheet<br>तुटीची रक्कम स्थिती- विवरणाला स्थलांतरित | | 2,79,749.93 |
| Total Rs. एकूण रु. | | 5, 45,394.84 |

As per out Report of Even Date
ह्या तारखांच्या आमच्या अहवालाप्रमाणे

FOR U. B. GUJAR & CO.

CHARTERED ACCOUNTANTS चार्टर्ड अकाउंटन्ट
AUDITORS ऑडिटर्स

'स्व' रूपवर्धिनी करिता

खजिनदार कार्याध्यक्ष अध्यक्ष

Dated at : 16 Aug. 1994
दिनांक :

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. जयसिंगभाई मरिवाला
श्री. नानासाहेब पवार
श्री. अविनाश वारदेकर
श्री. एम. ए. वदूदखान

❀

## कार्यकारी समिती

अध्यक्ष
**श्री. पु. व श्रॉफ**

❀

उपाध्यक्ष
**श्री. अ. न. गोगावले**

❀

कार्याध्यक्ष
**श्री. कृ. ल. पटवर्धन**

❀

सहकार्याध्यक्ष
**श्री. व ना. दाते**

❀

सहकार्याध्यक्षा
**श्रीमती कुंतला मुजुमदार**

❀

कोषाध्यक्ष
**श्री. श्री. शं. सामळ**

❀

सचिव
**श्री. रा. प. देसाई**

❀

सहसचिव
**श्री. शिरीष रा. पटवर्धन**

## सभासद

श्री. प्रतापराव पवार
श्री. वा. दे. संचेती
श्री. कां. गि. शहा
श्री. कृ. गो. लवळेकर
प्रा. श्रीमती उष:प्रभा देसाई
श्री. उदय गुजर
श्री. पुखराजजी जैन
सौ. चंद्राताई दलाया

## संपर्क

कार्याध्यक्ष :
**श्री. कृ. ल. पटवर्धन**
४२८/२०, शिवाजीनगर,
पुणे – ४११ ०१६.
दूरध्वनी : ३४५८३५

किंवा

**कार्यवाह**
**श्री. रा. प. देसाई**
दूरध्वनी : ६६४३७५

किंवा

**श्रीमती कुंतला मुजुमदार**
दूरध्वनी : ३४३६०६

**'स्व'-रूपवर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ,
पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
☎ ६२१७०४